# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००५ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ९५**

MAHMAR1 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • १९३५ • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सहावे/ अंक ८/ जुलै २००५

## संपादकीय

### ओंजळभर चांदणं पेरण्याचा प्रयत्न ...

आषाढी एकादशीच्या वारीच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या हातातून वारीच्या मार्गावर विविध वृक्षांच्या अगणित बिया फेकायच्या, रुजवायच्या आणि पंढरपूरला जाणाऱ्या रस्त्यांवर दुतर्फा झाडे उगवायची ही कल्पना हरियालीच्या पूनम सिंगवी यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. एक अत्यंत चांगला समाजाला सकारात्म दृष्टिकोण देणारा, ओंजळभर का होईना चांदणे पेरणारा हा विचार. पूनम सिंगवींशी या विषयावर बोलणं झालं तेव्हा लोकमान्य टिळकांच्या काळातील बोलके सुधारक आणि कर्ते सुधारक अशा सुधारकांच्या दोन वर्गांची आठवण झाली. सिंगवींसारखी काम करणारी माणसं काही बरं व्हावं या तळमळीने काम करत रहातात.

पंढरपूरच्या वारी बरोबरच अनेक धार्मिक क्षेत्रांकडे लक्ष वळवता येण्यासारखे आहे. अष्टविनायकासारखी लोकप्रिय श्रद्धा स्थाने आहेत तर अगदी 'महापौर मॅरेथॉन' धावणारे ठाण्यातले ट्रॅक्स् आहेत. या सर्व रस्त्यांवर जाणीवपूर्वक बिया टाकल्या गेल्या तर काही काळाने का होईना, हिरव्या रंगांची स्वप्ने उगवतील. डोंगर हिरवे करण्यापेक्षा प्रत्यक्ष वस्तीत हिरवी स्वप्ने पेरली तर अधिक चांगलं. त्या झाडांची लॅटिन नावं काय, त्यांच्या जाती, प्रजाती कोणत्या याचा अभ्यास करणाचांनी करावा, पण त्यांनी सावली दिली तर त्या सावलीमुळे मिळणारे धन्यवाद श्रेष्ठ असतील.

पूनम सिंगवींनी या बियांचे संकलन करणारी बीज संचयिका चालू होईल असे पहावे. इतकी फळे, भाज्या आपल्याला बिया देतात. रोजच त्या बिया कचऱ्यात टाकून त्यांची डंपिंग ग्राउंडस् बनवायची हे कृतघ्नपणाचे आहे. महापालिका 'डंप' करण्यापलिकडे काही करताना दिसत नाही. त्यामुळे गाव तिथे सीड बँक निर्माण झाली तर **'हिरव्या भूमीचा स्वर्ग'** महाराष्ट्रात अवतारायला वेळ लागणार नाही ! प्रत्येक बी मध्ये असणारं सुक्ष्म झाड हे भविष्याचा आधार ठेल.

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सहावे / अंक ८ / जुलै २००५



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १० वे / अंक १ला)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | मूर्ती आणि मूर्तिपूजा | शं. बा. मठ | ३ |
| २) | ''केशवसुत कसले मेले ? केशवसुत गातचि बसले'' आधुनिक मराठी कवितेचे जनक - ( कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुत ) | आशा भिडे | ८ |
| ३) | मधु मंगेश कर्णिक यांच्या साहित्यातील महानगरीय संवेदना | प्रा. प्रदीप कर्णिक | १५ |
| ४) | 'भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने- ४ | यशवंत साने | २२ |
| ५) | पहिलं पुस्तक | रमेश राऊत | ३२ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# मूर्ती आणि मूर्तिपूजा

*सर्व चराचरात ईश्वर पहाणारी भारतीय संस्कृती. या संस्कृतीने मनातील ईश्वराला साकार रूप देतान मूर्त रूप देतांना ज्या मूर्ती या संस्कृतीत मान्य पावत गेल्या त्या विषयीची ही लेख माला. यातील दुसरा लेख देत आहोत.*

*- संपादक*

(लेखांक दुसरा)

## प्रतिमेचे प्रकार

प्रतिमा तीन प्रकारच्या असतात. चल, अचल, आणि उभय विध. हलवता येणासारख्या ज्या उत्सव मूर्ती असतात त्याला 'चल' म्हणतात. जमीनीत वा एखाद्या आसनावर स्थिर करून ज्या प्रतिष्ठित केलेल्या असतात त्या 'अचल' मूर्ती. प्रसंगोपात ज्या हलवाव्या लागतात एरवी स्थिर असतात त्या 'उभय विध' प्रकारात मोडतात. या तीनही प्रकाराबद्दल आगम शास्त्रानुरुप थोडक्यात वर्णन खालील प्रमाणे -

### चल-

या प्रकारातील मूर्ती साधारणतः धातूच्या आणि कमी वजनाच्या असतात. उत्सवाचे वेळी सोयिस्कररीत्या एका जागेतून दुसरीकडे हलविणे सोयिस्कर होतील इतपत त्यांचे वजन असते. या मूर्तीतही दोन प्रकार संभवतात. एक केवळ 'उत्सव मूर्ती' व दुसरी नित्य पूजसाठी असलेली मूर्ती. उत्सव मूर्तीलाच 'कौतुक मूर्ती' असेही म्हणतात. आणि केवळ उत्सव प्रसंगीच या मूर्तीचे दर्शन घडते. रोजच्या पूजेच्या मूर्तीला बलिबेर अगर स्नपनबेर असे म्हणतात. या मूर्तीला रोज स्नान घातले जाते, बली अर्पण केला जातो. देवतापरिवारासह ही मूर्ती ठेविली जाते. अशा प्रकारे या मूर्तीचा विनियोग सांगितला आहे.

### अचल-

याला मूळ विग्रह म्हणतात. या प्रकारातच स्वयंभू मूर्तीचाही समावेश करण्यात आलेला आहे. याला 'ध्रुवबेर' असेही म्हणतात. या मूर्ती बहुत करून पाषाणाच्या असतात. गर्भगृहात जमीनीत वा चौथऱ्यावर स्थिर केलेल्या असतात. या मूर्ती आकाराने मोठ्या असतात. त्यामुळे वजनदार असतात. याच कारणाने सहसा त्या हलवल्या जात नाहीत. या मूर्तीचे तीन प्रकार संभवतात - १) स्थानक २) आसन ३) शयन म्हणजेच - १) उभी मूर्ती २) बसलेली मूर्ती ३) झोपलेली मूर्ती. विष्णूदेवताच शयन प्रकारात असू शकते. शेषशायी विष्णूची मूर्ती ही श्रीरंगम् येथे पहावयास मिळते. या शिवाय वैष्णव पंथियांच्या मता प्रमाणे यांचे आणखी चार प्रकार संभवतात. योग, भोग, वीर, अभिचारक. वरील तीनही प्रत्येक प्रकारात हे चारही भाग संभवतात. असे अचल मूर्तीचे एकूण बारा प्रकार होतात. हे चार प्रकार त्या त्या साधकाकडून पूजले जातात. योगद्वारे ज्याला आध्यात्मिक ज्ञान प्राप्त करून घ्यावयाचे आहे, साक्षात्कार करून घ्यावयाचे आहे तो योगमूर्तीची आराधना करतो. बदरीनारायण येथे श्रीविष्णूची मूर्ती आसनस्थ योगमूर्ती आहे. सुख-समृद्धीसाठी भोग मूर्तीचा अवलंब करण्यात येतो. शत्रूवर विजय मिळविण्यासाठी वीर मूर्तीची उपासना केली जाते. हनुमान, वीरभद्र, खंडोबा या मूर्ती त्या प्रकारात मोडतात. शत्रूवर चाल करून निःपात करण्यासाठी अभिचारिकी मूर्ती पूजिली जाते. दुर्गा, काली, चण्डी, नृसिंह इत्यादी मूर्ती या प्रकारात मोडतात.

या मूर्ती प्रकारासंबंधी विशेष माहिती वैखानस आगम या ग्रंथात पाहावयास मिळते.

ध्रुवं नु ग्राम रक्षार्थं अर्चनार्थं तु कौतुकम्।
स्नानार्थं स्वपनं प्रोक्तं बल्यर्थं बलिबेरकम् ।
उत्सवं उत्सवार्थंच पंच बेरा प्रकल्पिता ।
-(भृगुप्रोक्त वैखानसआगम)

चलाचल मूर्ती हा प्रकार विशेष आढळत नाही. जगन्नाथपुरीला ही मूर्ती लाकडी असल्याने तिथे हा प्रकार आढळतो.

आणखीही मूर्ती संबंधीचे प्रकार कल्पिले गेले आहेत. त्याचे तीन प्रकार आहेत. चित्र, चित्रार्थ व चित्रभास. या संबंधीचे वर्णन असे आहे - **सर्वावयवं संहष्ट चित्रं इति उच्यते ।** गोलाकार मूर्ती असतात, या मूर्तीत सर्व अवयव स्पष्ट असतात. चित्रार्ध-पूर्णाकृती नसलेली केवळ छाती पर्यंतचा भाग असलेली मूर्ती, चित्राभास-निम्नोन्नत्त परे भित्तौ लिखित्वा भासं उच्यते । भिंतीवर, कपड्यावर अगर तत्सम स्वरूपातले याला चित्राभास म्हणतात. तसेच याची आणखी एक प्रकाराने विभागणी आढळते. व्यक्त-पूर्णाकृती कोरलेले शिल्प. व्यक्ताव्यक्त - अर्धाकृती शिल्प, अव्यक्त - केवळ चिन्हांच्या द्वारे निर्दिष्ट केली जाणारी. उदा. शालिग्राम, बाणलिंग इत्यादी.

विष्णु देवते खेरीज दुसरी कोणतीही देवता शयन स्वरुपात असू नये असे शास्त्रात सांगितले गेले आहे. विष्णु व्यतिरिक्त असलेली मूर्ती उभी वा बसलेली या दोनच अवस्थेत असली पाहिजे. फक्त विष्णूच शेषशायी असल्याने शयन स्वरूपात त्याची मूर्ती असते. वरील प्रकारा व्यतिरिक्त आणखीही एक प्रकार मूर्तींच्या बाबतीत संभवतो. हा प्रकार स्वभावानुरुप संबंधीचा आहे. उग्र वा रौद्र, सौम्य वा शांत, या प्रकारच्या मूर्ती आढळतात.

**उग्रमूर्ती** - या मूर्तींचे दात बहुधा लांब व मोठे असतात. याला मोठीली व तीक्ष्ण नखे असतात. अनेक हात असतात. हातात विविध शस्त्रे धारण केली जातात. डोळे विस्फारित असतात. जीभ लांब असते. तोंडातून अग्निज्वाला जणू निघतात असा भास होतो. कारण मुख मंडलाभोवती अग्निज्वाला असते. काही मूर्तींत गळ्यात रुंड माळा आढळते. अशा प्रकारच्या मूर्ती विशेषतः काली, चंडी, चामुंडा या देवतांच्या स्वरुपात संहार घडवून आणण्यासाठी पूजिल्या जातात.

**शांत मूर्ती** - प्रसन्न चित्त धारण केलेली, सर्व साधकावर अनुग्रह करणारी, सौम्य स्वरुपाची, कोणालाही मूर्ती जवळ जाण्यास भीती वाटणार नाही, अनुकूल अशी मूर्ती. उदा. गोपालकृष्ण, बाळकृष्ण, शेषशायी विष्णु. ही देवता देखील रौद्र रूपात आढळते. - नृसिंह, परशुराम, आदि शिव कामदहनाच्या वेळी रौद्ररुप धारण करतो. त्रिपुरांतक स्वरूपातही तो उग्र आहे. अशा प्रकारच्या उग्र मूर्ती भर वस्तीत, शहरात व ग्रामात असू नयेत असा दंडक आहे. या देवतांची मंदिरे गावाबाहेर असावीत.

**चार मूर्ती व त्यांच्या अवस्था -**

**योग** - (उभी, बसलेली, शयित अवस्थेत) या प्रकारच्या मूर्तींचे मंदिर गावाबाहेर असावे. विशेषतः नदीकाठी, नद्यांच्या संगमावर, टेकडीवर, जंगलाच्या पायथ्याखाली, उत्तुंग पर्वतावर. या मूर्तींचा साधक योगी आढळतो. त्याला मनुष्य वस्तीपासून त्रास होऊ नये व साधना करून योग प्राप्त करुन घेण्यास अडचण पडू नये ही त्याच्यात सोय आहे. असा साधक शांत ठिकाण शोधणार. म्हणून अशा प्रकारच्या मूर्तीचे मंदिर वरील निर्दिष्ट स्थळी असणेच योग्य होय.

**भोग** - (तीनही अवस्था उभी, बसलेली, शयित) या मूर्तींचे साधक शहरी वा ग्रामीण प्रजा असते. कारण देवताराधन करून सुखप्राप्तीची त्याची अपेक्षा असते. या साधकाला सुख, समाधान आणि समृद्धी हवी असते. म्हणून मंदिरे गावात, मध्यमवस्तीत असावीत. सर्वांना पूजा, प्रार्थना सुलभतेने करता यावी व देवतानुग्रह प्राप्त करून घेता यावा या साठी गावातच अशी मंदिरे असणे

आवश्यक आहे.

**अभिचारिक** - (तीनही अवस्थेत) शत्रूचा निःपात करण्यासाठी, त्यावर मात करण्यासाठी, देवताराधन केले जाते. संहार आणि हत्या या देवतेकडून अभिप्रेत असल्याने ही अमंगल देवता मानली जाते. म्हणून गावात अशा प्रकारचे देऊळ असू नये. जंगल, पर्वत दलदलीची जागा, किल्ल्याच्या बाहेर, शत्रूचा निःपात करणे व त्याजपासून बचाव करणे शक्य आहे. अशा जागी या देवतेची स्थापना करावी, 'वन, गिरी, जल, दुर्ग, राष्ट्रान्ते शत्रु दिङमुखे' असा उल्लेख आहे.

**वीर** - (तीनही अवस्थेत) शारीरिक बळ, पराक्रम या साठी या देवतेची आराधना करण्यात येते. ही मंदिरे गावात व गावाबाहेर असल्यासही चालतील. मारुतीचे मंदिर गावात व गावाबाहेरही असते.

देवळे कोणत्या स्थळी असावीत याचा निर्देश वर केलेला आहेच. विविध प्रकारच्या गर्भगृहाबद्दलही माहिती या ग्रंथातून उपलब्ध होते. याचे कारण देताना असे म्हटले आहे की, विविध देवतांच्या शान्त्यर्थ, तुष्ट्यर्थ व निरनिराळ्या अवस्थेत असलेल्या मूर्तींची स्थिती योग्य रहावी म्हणूनही असे विविध प्रकार कल्पिले आहेत. या संबंधीचे साद्यंत वर्णन आगम ग्रंथातून पाहावयास मिळते.

सर्व साधारणपणे देवळे तळ्याकाठी, नदी काठी, नद्यांच्या संगमाच्या ठिकाणी, समुद्राकाठी, गावठाणात, टेकडीवर, टेकडी वा डोंगराच्या पायथ्याशी तसेच अनन्य साधारण विभूती होऊन गेलेल्या ठिकाणी आणि संत समागम होऊ शकेल अशा संत ठिकाणी बांधावीत. विशेष प्रकारच्या मंदिराचा विचार करताना शिव मंदिर हे गाव, शहर वा खेडे यांच्या संदर्भात ईशान्य दिशेकडे बांधण्यात यावे असे म्हटले आहे. विष्णु मंदिर गावाच्या पूर्वेला मात्र द्वार पश्चिमेकडे असावे म्हणजे सूर्याच्या पश्चिम दिशेला प्रवेश द्वार असावे. मूर्तीचे मुख मात्र पूर्वेकडे असावे. दुर्गादेवीचे मंदिर दक्षिणेकडे उभे करावे. कार्तिकेयाचे मंदिर वायव्येला असावे. विनायकासहित सप्तमातृका यांचे मंदिर उत्तरेकडे असावे. किल्ल्याच्या भिंतीला लागून मंदिर असल्यास उत्तरदिशेकडे तोंड असावे. ज्येष्ठादेवीचे मंदिर तळ्याच्या काठी असावे.

मेघ डंबरी बद्दल माहिती देताना असे म्हटले आहे की या वेगवेगळ्या आकाराच्या असतात. काही समचतुरस्त्र म्हणजे चौकोनी, काही वृत्त म्हणजे गोल. चौकोनी मेघ डंबरी उभी वा बैठी मूर्ती ज्या देवळात असेल त्यासाठी असे समजावे. लंब-चौकोनी व अंडाकृती मेघ डंबरी ही फक्त शेषशायी विष्णु मंदिरासाठीच सांगितलेली आहे.

मूर्तीचे मुख कोणत्या बाजूस असल्यास काय फलित प्राप्ती होते याचे वर्णन करताना म्हटले आहे शेषशायी विष्णूचे मुख-प्रवेशद्वार उत्तरेकडे असल्यास मुख पूर्वेस असावे. दक्षिणेकडे द्वार असल्यास मुख पश्चिमेस असावे. पूर्व वा पश्चिम द्वारे असल्यास मुख दक्षिणेकडे असावे. या प्रमाणे मुख असल्यास पुजाऱ्याच्या डाव्या अगर उजव्या बाजूनेच मूर्तीचे मुख असू शकेल. व त्याला अर्चना करणे सोपे जाईल. निरनिराळ्या स्वरुपातील मूर्ती पूजण्याचे कारण साधकाला त्याच्या इच्छित गोष्टी प्राप्त करता याव्यात हा हेतू असतो. पूर्व मुखी मूर्ती असल्यास ती साधकाला सर्व प्रकारे सुख समाधान देते. **(शांतिदम्)** पश्चिम मुखी मूर्ती साधकाला समृद्धी देते. **(पुष्टिदम्)** दक्षिणाभि मुखी मूर्ती शत्रूवर पराक्रम गाजविण्यास सामर्थ्य देते. **(जयदम्)** उत्तराभिमुख मूर्ती साधकाला शत्रूवर चाल करून निःपात करण्यास मदत करते. **(अभिचारिकम्)**

**फल**-भर वस्तीत असलेल्या विष्णुदेवतेच्या मंदिरामुळे त्या स्थळातील संख्या अभिवृद्धी होते. कार्तिकेय आणि चामुंडाच्या पूजनाने बालकांना स्वास्थ्य लाभते. सूर्य उपासनेने सर्व शारीरिक व मानसिक रोग दूर होतात. काम देवतेच्या पूजनाने शरीर सौष्ठव वाढते. गणेश पूजनाने

हातात घेतलेली कामे निर्विघ्न पणे पार पडतात. दुर्गा आणि उमा यांच्या पूजनाने शत्रूवर जय मिळवता येतो. लक्ष्मीच्या पूजानने धनाची वृद्धी होते. दारिद्र्य नष्ट होते. सरस्वतीच्या पूजनाने ज्ञानवृद्धी होऊन सर्व ज्ञान मुखोद्‌गत राहाते. सप्तमातृकांच्या पूजनाने वैभवात भर पडते, आणि शिवसाधनाने जी जी इच्छा असेल ती ती फलित होते.

### कोणती मंदिरे कुठे असावीत -

शिव आणि विष्णु मंदिरे कोणत्या भागात वसविली आहेत त्या प्रमाणे ती परिणाम कारक ठरतात. मात्र उग्र विग्रह गावाच्या पूर्वभागी असल्यास त्या गावाचा विनाश होतो. आग्नेय दिशेला असल्यास गावातील स्त्रिया व्यभिचारी वृत्तींच्या होतात. दक्षिणेस असल्यास भूत पिशाच आदी बळावतात. नैऋत्य दिशेला असल्यास प्रजाक्षय रोगाने वा उत्पाताने संभवतो. पश्चिमेस असल्यास मानसिक व्यग्रता अनाचार दुःखद वातावरण निर्माण होते. वायव्येला असल्यास अनाचाराला ऊत येईल. उत्तरेकडे असल्यास सर्व तऱ्हेची संकटे येतील. ईशान्येला मात्र सर्व प्रकारे शांती समृद्धी ही प्राप्त होतील. म्हणून उग्र मूर्ती गावाच्या मध्यभागी असू नये असा दंडक आहे. असलीच तर शांती विग्रहाबरोबर त्याची स्थापना करावी म्हणजे सौम्यता प्राप्त होईल. अन्यथा उग्र मूर्तींच्या मंदिरासमोर मोठे तळे असावे. शांति मूर्तीचे मंदिर कुठेही चालते विशेषतः असे मंदिर भर वस्तीत असावे. कारण शांति समृद्धी प्रदीर्घ जीवन यांचा वर्षाव करणारी ही देवता आहे.

### मूर्तीची प्राण प्रतिष्ठा कुणाकडून व्हावी -

वराह मिहिर म्हणतो - विविध प्रकारच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना करताना त्या प्रवृत्तीची व्यक्ती असावी.

वैष्णव प्रतिमा प्राणप्रतिष्ठा भागवताकडून, भगवद्‌भक्ताकडून करावी.

शिवाची प्राण प्रतिष्ठा भस्म धारण करणाऱ्या शिवभक्ताकडून करावी.

सूर्याची प्राण प्रतिष्ठा ब्राह्मणाकडून करवावी. आणि सप्तमातृका प्राण प्रतिष्ठा मातृका मंडळाकडून करवावी.

### मूर्तीपूजनः साधक महत्वाचा

मूर्तीचे रुप कशा पद्धतीचे असावे हे साधकाच्या उत्तरोत्तर मानसिक विकासाचे लक्षण मानले जाते. साधकाची मानसिक उन्नती कितपत झाली आहे, आध्यात्मिक ज्ञानाचा कितपत अनुभव घेतलेला आहे, ब्रह्म कल्पनेतून कितपत बुद्धीचा आवाका निर्माण झालेला आहे, आपल्यातच स्वतःचा बोध करून घेण्याची क्षमता निर्माण झाली आहे की नाही या साऱ्या गोष्टीवर मूर्तीपूजा अवलंबून आहे. 'स्व' बोध करून घेतलेल्या योगीजनांना देवता आणि मंदिरे यांची आवश्यकता भासत नाही. ते निर्गुण निराकारतेतच दंग असतात. बाह्य आलंबनाची त्यांना आवश्यकताच भासत नाही. असे योगी अत्यल्प आढळतात. बहुअंशी लोकांना इतपत मजल गाठता येत नाही. अशांची संख्याच फार मोठी आहे. म्हणून मंदिरे, मूर्ती यांची आवश्यकता आहेच. अशा मंडळींना मंदिरे, मूर्ती इत्यादी फार मोठा दिलासा देतात. आणि त्यासाठीच विविध देवता विविध आकाराच्या स्वरूपात आवश्यक आहेत. विविध आकाराचे विग्रह (मूर्ती) साधकाच्या मानसिक स्तराला उपयुक्त ठरतील अशा पद्धतीने निर्माण केले जातात. याचेही एक शास्त्र आहे. या विग्रह निर्मितीबद्दलच्या नियमावली आहेत. जाबाल उपनिषदात असे म्हटले आहे की -

शिवं आत्मनि पश्यन्ति प्रतिमासु न योगिनः ।
अज्ञानानांभावनार्थाय प्रतिमाः परिकल्पिताः ।
अज्ञानानां भावनार्थाय साक्षात् भगवत् पूजायाः ।

संकल्पं कर्तुं अशक्यत्वेन प्रतिमायां एव कर्तव्यात् तदर्थं प्रतिमा निर्मातण्या ।

(तन्त्रसार माधवाचार्य)

योगी लोक शिवतत्वाचीच उपासना करतात. अज्ञजनाना ते शक्य होत नसल्याने ती भावना निर्माण होण्यासाठी प्रतिमेचे आलंबन निर्माण केले जाते. प्रतिमापूजन गौण असले तरी त्याची आवश्यकता प्रतिपादलेली आहे. हेच सनातन धर्माचे वैशिष्ट्य होय. ज्यांची बुद्धी अपक्व आहे त्यांनाच प्रतिमा उपयुक्त होत. प्रतिमा पूजनाने पुनर्जन्मादी शृंखला निर्माण होत असल्याने योगीजन तिकडे वळत नाहीत.

विग्रेहेषु पूजा पुनर्जन्म भोगकरी ।
तस्मानमुमुक्षुः स्वहृदयार्चनंएव करोति। बाह्यार्चनं परिहरति।

**अमूर्तांचा विचार सर्वांना अशक्य -**

काही लोकच अमूर्तांचा विचार करु शकतील. इतरांना ते अशक्य वाटते म्हणून अमूर्तांचा विचार काही माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांच्या विचाराना, भावनाना, अनेक मार्गाने व्यक्त केले. वाचेने (मंत्ररुपाने) चित्ररुपाने, शिल्परुपाने, चिन्हांच्या द्वारे, संख्या पद्धतीने अशा विविध मार्गांचा अवलंब करुन मानव अमूर्ताचे दर्शन घेण्याचा प्रयत्न करतो. अशा मानवी स्वभावाचे योग्य बोध घेऊन हे अमूर्ताचे दर्शन अत्यंत सामान्यजनापर्यंत पोचावे व त्यातून त्यांना स्वरुपाचे दर्शन घडावे या संकल्पनेने ऋषिलोकांनी वरील विविध मार्गांचा अवलंब करून सर्व मानवांना एक प्रकारचा दिलासा दिला. व सर्वांनाच उत्क्रान्त होण्याचा मार्ग सुलभ करून ठेविला.

(क्रमशः)

**- शं.बा.मठ**
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

## माहिती करून घ्या !

**'ठाणे महाविद्यालय परिसर'** असा उल्लेख करण्याऐवजी ठाणा कॉलेज, बेडेकर कॉलेज असा उल्लेख करणारांसाठी -

महाविद्यालय परिसरात **'विद्या प्रसारक मंडळ'** या मातृसंस्थेच्या पुढील संस्था आहेत. त्यांची पूर्ण नावे मुद्दाम देत आहे. केवळ ठाणा कॉलेज म्हणण्यापेक्षा महाविद्यालयाचे नेमके नाव व **मराठीत उच्चारले तर ....**

१) बांदोडकर कॉलेज- बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय.

२) जोशी कॉलेज - केशव गणेश जोशी कला महाविद्यालय

३) बेडेकर कॉलेज - नारायण गोविंद बेडेकर वाणिज्य महाविद्यालय

४) लॉ कॉलेज - ठाणे महानगरपालिका विधी महाविद्यालय

५) व्हीपीएम् पॉलिटेक्निक - विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन महाविद्यालय

महाविद्यालय परिसराभोवती उद्यान आहे. हे उद्यान अजून विकसित होत आहे. या उद्यानाला 'ज्ञानमार्ग' हे नाव आहे. या उद्यानात छोटे कार्यक्रम (२५-३० जणांचे) सहज होऊ शकतात. कवी संमेलन, साहित्यिक चर्चा, कथाकथन इ. कार्यक्रमांना सोयीच्या ठराव्यात अशा काही जागा मुद्दाम बनविल्या आहेत.

ज्यांना यात रस आहे त्यांनी आमच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

- संपादक

# ''केशवसुत कसले मेले ? केशवसुत गातचि बसले''

## आधुनिक मराठी कवितेचे जनक - कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुत


*'केशवसुत' यांचे हे स्मृतिशताब्दी वर्ष आहे. त्या निमित्ताने केशवसुतांच्या कवितेचा हा एक विचार. - संपादक*

भाग दुसरा -

''केशवसुत मेले? '' व ''केशवसुतांची कविता वाचून '' या दोन कवितात 'गोविंदाग्रज' (राम गणेश गडकरी) यांनी आपल्या गुरुच्या कार्याची महती गाऊन आपला निन्तात आदर व्यक्त केला आहे. शेलेचे उरलेले अवतार कार्य केशवसुतांनी पूर्ण केले.

त्यांच्या काव्याने

'निजलेल्या जागृति आली, हो ताजे
जे थकलेले',
'गुढास रुप सापडले ! स्वच्छंद अचेतन
हाले',
'अणुरेणूंमधुनी आता, निघतील त्यांचे
चेले',
केशवसुत कसले मेले ? केशवसुत
गातचि बसले '



३. कवितात जो मार्मिक अभिप्राय व्यक्त झाला आहे त्यावरुन गोविंदग्रजांच्या मनावर केशवसुतांच्या कार्याचा केवढा पगडा बसला होता तो स्पष्ट होतो. 'अवतरुनि फिरुनी शेले । केशवसुत गाऊनि गेले ' असे उद्गार त्यांनी काढले.

मरणासचि आले मरणे, मग केले त्याने काळे ।
तो शब्द मुक्याला सुचले । गुढास रूप सापडले ।
स्वच्छंदअचेतन हाले ! नश्वर ते ईश्वर केले ।
केशवसुत गाऊनि गेले ।

गगनाचे फाटुनि पडदे, दिसले जे त्यापलिकडले

ज्ञानेश्वर-तुकारामांनी ज्याप्रमाणे आपली गुरुपरंपरा सांगितली त्याप्रमाणे केशवसुतांपासून आधुनिक कवींची परंपरा सांगण्याचा गोविंदग्रजांचा उद्देश होता. त्यांनी स्वतःचा 'केशवपुत्राचा महशूर । गोविंदाग्रज चेला सच्चा' असा उल्लेख केला आहे.

केशवसुत चिकाटीचे प्रयत्नशील व मोठे महत्वाकांक्षी होते. 'वाग्देवीसुत' असा त्यांनी स्वतःचा गौरव केला आहे. त्यांचा काव्य संग्रह आधुनिक मराठी कवीत प्रथम प्रसिद्ध झाला. त्यांना आधुनिक कविकुलगुरु मानण्यात येते. केशवसुतांची कविता त्यांच्या मृत्यूनंतर बारा वर्षांनी १९१७ मध्ये हरिभाऊ आपट्यांनी पहिल्यांदा प्रसिद्ध केली. तरीपण नव्या मनुचा साक्षात्कार प्रथम केशवसुतांच्या कवितेत झाला म्हणून ते नव्या कवितेचे प्रवर्तक होत.

त्याकाळी टोपण नावाची टूम निघाली होती. कवितेखाली स्वतःचे नाव घालण्यात कवीला संकोच वाटायचा. मग एक कवी, काव्य सेवक असे लिहित. त्यातूनच केशवसुत, गोविंदाग्रज, बी, केशवकुमार अशी नावे पुढे आली. रे. टिळक, बी, गोविंदाग्रज, बालकवी, माधवसुत, रेंदाळकर, तांबे आदी केशवसुत संप्रदायातले. माधवानुज व तांबे यांनी 'सॉनेट' काव्य प्रकार रुढ करण्यात केशवसुतांना साथ दिली. त्यांच्या मृत्यूनंतर 'तुतारी' मंडळ

निघाले. रे. टिळक, बालकवी या सदस्यांनी त्यांच्यासारख्या रचना करून आदर व्यक्त केला. गोविंदाग्रज व रेंदाळकर यांनी तर त्यांच्या शिष्यत्वाची बिरुदे आपल्या अंगावर अभिमानाने मिरवली.

'समाजभिमुखता' हा त्यांच्या काव्याचा प्रमुख विशेष. केशवसुत म्हटल्यावर त्यांच्या सामाजिक कविताच जास्त डोळ्यापुढे तरळतात. त्यांच्या सामाजिक कविताच जास्त आहेत. तुतारी, स्फूर्ती, नवा शिपाई, गोफण व मूर्तिभंजन इ.

**तुतारी** - सर्वात प्रसिद्ध कविता. तिच्या बाह्यांगाचे व अंतरंगाचे अनुकरण पुढील कवींनी केले. तिच्या नावाने मंडळ स्थापन झाले तिचा एक संप्रदायच निर्माण झाला -

एक तुतारी द्या मज आणुनि,
फुंकिनी मी जी स्वप्राणाने,
भेदुनि टाकिन सगळी गगने,
दीर्घ जिच्या त्या किंकाळीने;
अशी तुतारी द्या मज लागुनि

जुने जाऊ द्या मरणालागुनि; जाळुनि किंवा पुरुनी टाका, ह्यासारख्या ओळी तर तोंडोतोंडी - वाक्प्रचारासारख्या वापरल्या जाऊ लागल्या. तसेच-

प्राप्तकाळ हा विशाल भूधर,
सुंदर लेणी तयात खोदा

ह्या सारख्या ओळी अजरामर झाल्या. सुधारणेचा प्रत्यक्षोपदेश ओजस्वी अशा शब्दात काव्यात असा तुतारीनेच सुरु केला. कविजनांनी पुकारलेले सुधरणेचे 'शिंग' व 'बोंबाबोंब' ही काव्ये लिहून समाजातील अन्याय वेशीवर टांगले. गोविंदाग्रजांनी 'दसरा' कविता 'तुतारी' सदृश्यच होती. रेंदाळकर या कवीनेही 'शिंग' ही 'तुतारी'च्या धर्तीवर कविता लिहिली.

नवीन प्रतिपादनाकरिता पद्य प्रकारही नवा व अनुरुप पाहिजे म्हणून पादाकुलकाचा चरण घेऊन केशवसुतांनी नवीन योजना केली. हा पद्य प्रकार सुधारक काव्यात माधव ज्युलियनांनी योजला. त्यांनी त्याचे 'चाक धावती-मारी ठोकर' असे काव्य लिहिले.

आपल्याला जे सांगावयाचे आहे ते लोकांना जागे करणारे धक्का देणारे आहे याची कल्पना केशवसुतांना होती. जागे करण्याकरिता कर्कश वाद्यच हवे म्हणून तुतारी पसंत केली. पण ती दुसऱ्यांजवळ का मागितली? ही तुतारी मी वाजवीत आहे म्हटले असते तर पुढील बंडखोर वृत्तीशी ते सुसंगत झाले असते.

प्रत्यक्षोपदेश हीच कवितेची भूमिका. तीत ओजोगुण हा परिणाम करणारा व प्रसाद गुण आहे. रूढी ही समाजास लागलेली कीड आहे, जुने सोडून द्या; नवीन काही करा, नियम माणसासाठी असतात माणूस नियमांसाठी नसतो. नियम प्रगतीस विरोध करू लागले तर ते झुगारून द्या, समतेचा ध्वज उंच धरा इ. विचारांचा प्रचार त्यांनी या प्रदीर्घ कवितेतून केला. त्यांनी केलेला उपदेश हा त्याकाळी व आजही महत्त्वाचा आहे. तो काव्यात नवीन होता. तसेच नवीन पद्यरचनेद्वारे तो करण्यात आल्याने त्याला अधिकच वैशिष्ट्य व महत्त्व प्राप्त झाले आहे. हे केवळ समाज सुधारणेचे स्तोत्र नसून ते राष्ट्रीय काव्य आहे.

**स्फूर्ती** - 'स्फूर्ती' ही ओठा ओठांवर खेळणारी केशवसुतांची दुसरी कविता. ही स्फूर्ती काव्यरचनेची नसून नवविचार प्रवर्तनाची, बंडाचा संदेश देणारी आहे. या कवितेत ते बंडाची, जग उलथून देण्याची भाषा करतात. क्रान्ती हा शब्द अलिकडचा, बंडाचे विचार प्रकट करावयास जिभेवरील बंधने शिथिल व्हायला हवीत. त्यासाठी लागणारे मद्य म्हणजे बेभान करणारी रुढीविरुद्ध

बंडाची भावना. प्रस्तुत बंड सामाजिक आहे. हे 'रूढीचे दास' या शब्दावरून कळते.

काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभर उसळू द्या !
प्राशन करिता रंग जगाचे क्षणोक्षणी ते बदलू द्या !

पुढे ते म्हणतात -

परसुनि त्यांचे शब्द रूढिचे दास झणी ते खवळू द्या !

दुसऱ्या कडव्यातील त्यांचे तडफदार विचार त्यांच्या शब्दाशब्दांतून व्यक्त झाले आहेत.

कल्पनेची मग करूनी नौका व्योमसागरावर जाऊ,
उडुरत्ने या गरिब धरेला तेथुनि फेकुनिया देऊ !
अडवतील जर देव तरी
झगडू त्यांच्याशी निकरी,
हार न खाऊ रतीभरी,
देवदानवा नरे निर्मिले हे मत लोका कवळू द्या
काठोकाठ भरू द्या पेला फेस भराभर उसळू द्या !

तिसऱ्या कडव्यात-

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे,
टेकुनि ती जनताशीर्षावर जग उलथुनिया देउ कसे !

या कडव्यातील पद्यपंक्तिची तरफ जनताशीर्षावर टेकून जग उलथून देण्याची कल्पना शास्त्रीय स्वरूपाची असली व म्हणून कदाचित गद्यस्वरूप वाटली तरी ती अर्थपूर्ण आहे. या कवितेचा आवेश तुतारीच्या तोडीचा आहे.

**नवा शिपाई** - तुतारी - संप्रदायातील ही आणखी एक कविता. विश्वबंधुत्व हा तिचा विषय. शिपाई हा शब्द सैनिक या अर्थाचा आहे.

नव्या मनूतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे,
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे !
ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक पंथाचा,

किंवा

जिकडे जावे तिकडे माझी भांवडे आहेत, सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत; या कवितेत संपूर्ण मानव समाज आम्ही कोण ? - हो रचनाबाह्य यशस्वी असे सुनीत. यात कविमाहात्म्य हा विषय आला आहे. कवींचे, कलावंताचे असामान्यत्व या कवितेत चित्रित केले आहे. आवेशपूर्ण भाषा व आत्मविश्वास यांच्यामुळे या कवितेत एक प्रकारचा प्रभावीपणा आला आहे.

आम्ही कोण म्हणूनि काय पुससी ? आम्ही असू लाडके
देवाचे, दिधले असे जग तये आम्हांस खेळावया;
विश्वी या प्रतिभाबले विचरतो चोहीकडे लीलया,
दिक्कालातुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके !

या सुनीतात कोणास अहंकाराचा दर्प येतो. अहंकार आहे, पण तो वैयक्तिक नसून समस्त कविजातीबद्दल आहे आणि कदाचित कवींबद्दल काढलेल्या अनुदार उद्गारांची ती प्रतिक्रिया आहे. या कवितेची जी अनेक विडंबने झाली 'आम्ही कोण म्हणुनि काय पुससी ? दंताड वेंगाडुनि ' हे केशवकुमार (प्र. के. अत्रे) यांनी केलेले प्रसिद्ध विडबंन, ती त्या कवितेच्या सर्वपरिचितत्वाची द्योतक आहेतच पण ती मूळ कवितेच्या यशाचीही द्योतक आहेत.

आम्हांला वगळा-गतप्रभ झणी होतील तारांगणे;
आम्हांला वगळा-विकेल कवडीमोलावरी हे जिणे !

या शेवटच्या दोन ओळींनी मूळ विचारास परिणामकारकता आली आहे.

केशवसुतांनी प्रेम कविता लिहिली. जवळ जवळ

चाळीस एक कविता प्रेम विषयक आहेत, पण त्यांच्या कवितेचे नाव घेतल्यावर डोळ्यापुढे उभ्या राहणाऱ्या कवितात तुतारी, झपूर्झा, हरपले श्रेय, सतारीचे बोल, नवा शिपाई, स्फूर्ती, आम्ही कोण, घुबड, घड्याळ अशा प्रेमविषयक नसलेल्या कविताच मुख्य आहेत. प्रेमविषयक कविता एखादीच आठवेल. प्रेमविषयक इतक्या कविता लिहूनही 'प्रेमाचा शाहीर' पदवी त्यांना न मिळता त्यांच्या सच्च्या चेल्याला- गोविंदाग्रजांना मिळावी याला कारणही तसेच आहे. त्या कवितांतून स्वानुभूतीचे प्रकटन नाही. त्यामुळे गडकरी उर्फ गोविंदाग्रजांच्या काव्यात जे उत्कटत्व आहे ते त्यांच्या कवितेत नाही. दोन कविता पौराणिक प्रेम चित्रित करणाऱ्या, पाच कविता शुद्ध भाषांतरे, एक रूपांतरात्मक. काही कविता ह्या इंग्रजी सॉनेट मराठीत आणण्याचा प्रयत्नामधील भाग आहेत. तीन चार प्रेम कविता काव्य देवतेस उद्देशून आहेत. अगदी प्रथम पुर्या केलेले लेखनही त्यांचे स्वतःविषयीचे नसून त्या कवितेकरता घेतलेल्या भूमिकेतून लिहिल्या आहेत. त्याकाळी स्वतःच्या प्रेमासंबंधी सरळपणे लिहिण्यास संकोच वाटे. इंग्रजी कवितात ते होत आहे असे दिसल्यावर केशवसुतांनी ते मराठी आणले. त्यामुळे प्रेमविषयक नैराश्य त्यांना खरे जाणवत नसून इंग्रजी कवितावरुन ते उसने घेतलेले होते परंतु त्यांनी रुढ केलेल्या प्रथेमुळे पुढील कविजनास तद्‌विषयक आत्मविष्कार असा येऊ लागला.

**प्रीति** - प्रीति मिळेल का हो बाजारी ?
प्रीति मिळेल का हो शेजारी ?
प्रीति मिळेल का हो बागात ?
प्रीति मिळेल का हो शेतात ?
प्रीतिची नसे अशि ग मात; पहा शोधुनी हृदयात!

ही केशवसुतांची प्रेमविषयक तत्त्वज्ञान सांगणारी प्रसिद्ध अशी एकच कविता असावी.

**प्रेम आणि मरण** - ही गोविंदाग्रजांची कविता स्वानुभूतीचे प्रकटीकरण असल्यामुळे व त्यांच्या भाषा प्रभुत्वामुळे गाजलेली.

क्षण एक पुरे प्रेमाचा
वर्षाव पडो मरणांचा, मग पुढे

केशवसुतांची - वृत्ती 'साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे' अशी होती. 'रांगोळी घालतांना पाहून', घड्याळ ह्या कविता त्या वृत्तींच्या द्योतक आहेत. 'घड्याळ' हे इंग्रजीचे रूपांतर आहे परंतु मुळापेक्षा डावेच म्हणावे लागेल.

''गडबड घाई जगात चाले,
आळस डुलक्या देतो पण,
गंभिरपणे घड्याळ बोले-
आला क्षण गेला क्षण !''

'दिवस व रात्र' यापासून सुद्धा काही शिकता येते. मात्र कवितेत दिवसाच्या विरोधाने रात्र इष्ट व हितकारी असल्याचे सांगण्यात आले आहे. 'दिवस बोलतो, 'उठा झणी', रात्र विसावा घ्या म्हणते; या दो वचनी दिनरजनी बहुत सुबविती, मज गमते.

'सतारीचे बोल' व 'घुबड' ह्या मूळ इंग्रजी कवितांपेक्षाही काही दृष्टींनी सरस असे रुपांतर आहे, त्यांची रुपांतरे भाषांतरापेक्षाही फार सरस उतरली आहेत.

**सतारीचे बोल** - काळोखाची रजनी होती,
हृदयी भरल्या होत्या खंती;
अंधारातच गढले सारे
लक्ष्य, न लक्षी वरचे तारे;
विमनस्कपणे स्वपदे उचलित
रस्त्यांतुनि मी होतो हिंडत
एका खिडकीतुनि स्वर तदा
पडेल दिड दा, दिड दा, दिड दा !

या कवितेचा विषय संगीताचे सामर्थ्य असा आहे. मूळ कविता १४० ओळींची तर केशवसुतांनी ८८ ओळींची लिहिली आहे. कवितेची रचना अत्यंत प्रसादपूर्ण, अर्थवाही व सहज अशी झाली आहे. कवीची मूळ वृत्ती संगीत विरोधी होती. कारण त्यांचे हृदय दुःखी होते. पण संगीत ऐकून हा विरोध मावळून, अनुकूलता येऊन नैराश्याचे रुपांतर आशेत झाले, तीमधून उदात्तता, प्रेमरस असा क्रम देऊन कवीने भावनोत्पत्तीस सुसंगत रुप दिले आहे. 'धरापोटी असती मोठी फळे गोमटी' यासारखे सुभाषितात्मक प्रयोग विचार शोभा आणखी वाढवीत आहेत,

शांत वाजली गती शेवटी
शांत धरित्री, शांत निशा ती;
शांतच वारे, शांतच तारे,
शांतच हृदयी झाले सारे !
असा सुखे मी सदनी आलो,
शांतीत अहा ! झोपी गेलो,
बोल बोललो परी कितिकदा
स्वप्नी दिड दा, दिड दा, दिड दा

'पद्यपंक्ति' या कवितेतील पुढील ओळी लिहिण्याचा हेतू बोधाचाच, पण त्यांना सुभाषिताचे स्वरुप आले आहे. 'स्फुट विचार' हा तोच प्रकार आहे.

आमुचा पेला दुःखाचा
डोळे मिटुनि प्यायाचा;
पिता बुडाशी गाळ दिसे,
त्या अनुभव हे नाव असे!
फेकु नि द्या तो जगावरी;
अमृत होऊ तो कुणीतरी

ह्या 'पद्यपंक्ति' नंतर 'स्फुट विचार' पाहा-

विश्वाचा विस्तार केवढा ?
ज्याच्या त्याच्या डोक्याएवढा !

सृष्टि केंद्र तो कवण्या ठायी
ज्याच्या त्याच्या आहे हृदयी

'झपूर्झा' ही, तसेच 'कोणीकडून ? कोणीकडे?' 'म्हातारी' 'हरपले श्रेय' 'आहे जीवित काय? ' या केशवसुतांच्या प्रसिद्ध तात्त्विक किंवा गूढगुंजनात्मक कविता भावनेपेक्षा इथे विचारांना प्राधान्य मिळते. 'झपूर्झा' ही त्यांच्या सुप्रसिद्ध कवितांपैकी एक -

हर्षखेद ते मावळले
हास्य निमाले । अश्रु पळाले;
कंटक शल्ये बोथटली,
मखमलीची लववटली;
काही न दिसे दृष्टीला
प्रकाश गेला । तिमिर हरपला;
काय म्हणावे या स्थितिला ?
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

जीवनविषयक तत्त्वज्ञानाशी संबंध नसणारी, तरीही गूढगुंजनात्मक स्वरूपाची अशी ही कविता. आरंभी तिचे नावच अत्यंत चमत्कृतिजन्य वाटले व ते तसे आहेही. पद्यप्रकारही नवीनच, विचारही थोडासा गहन. गूढतेचे व गुंजनाचे असे दुहेरी स्वरुप असल्याने ही कविता खऱ्या अर्थाने गूढ गुंजनात्मक झालेली आहे. बाळानंदाचा चरण हा धावत्या चालीचा व नर्तनानुकूल अर्थाला अनुरुप आहे. 'झपूर्झा' होणारी शब्दसंहिता होय. खेळाला वेग येताच गती वाढून 'झपूर्झा' असाच नाद जवळजवळ ऐकू येतो. या अवस्थेतील खेळणाऱ्या मुलींची तन्मयता व्यक्त करण्यासाठी केशवसुतांनी हा शब्द योजला. ही अवस्था

सुखदुःखाच्या द्वंद्वाच्या पलीकडली असल्याने हास्य-अश्रू, प्रकाश-तिमिर, कंटक-मखमल इ. द्वंद्वे तिला भासत नाहीत. ही 'झपूर्झा' ची अवस्था प्राप्त झाली की प्रतिभा काही वेगळ्याच वातावरणात विहरू लागते व तिला नवीन गोष्टी सुचतात. ज्यांना नवीन काही शोधायचे आहे त्यांनी ही तन्मयता आत्मसात केली पाहिजे.

कोणीकडून ? कोणाकडे ? - जीवनाविषयीचा एक गंभीर व खोल विचार 'आपण कोठून आलो? व कोठे जायचे आहे?' या प्रश्नाची सामान्य उत्तरे अनेक आहेत पण त्यांनी समाधान होत नाही. आपण जेथून आलो ते अज्ञयच. (अंधारच) जिथे जावयाचे तेही अज्ञेयच. पण विचारांनी दृष्टी पालटते. जे अंधकारमय वाटत होते तेच प्रकाशमय आहे हे कळते. आपण जेथून आलो तिकडे, त्या आपल्या घराकडेच परत जायचे आहे. मात्र येथील ऋणे फेडून मग वर्डस्वर्थच्या कवितेचे रुपांतर, आशयाच्या गहनतेच्या मानाने केशवसुतांनी त्यांची प्रचिती बरीच सुकर केली आहे. रुपकाच्या योजनेने त्यास काव्यरुपही मिळाले आहे.

कोणीकडून कोणीकडे ?
'इकडुनि तिकडे' म्हणती गडे !
येथुनि - तेथे, मागुनि पुढे
हे तर नित्यच कानी पडे;
पण समाधान का कधी तयाने घडे ? -जिवलगे!

यातील जिवलगे म्हणजे स्वतःची बुद्धी; कारण तीच असले प्रश्न उपस्थित करते.

**हरपले श्रेय -** केशवसुतांची सर्वात वादग्रस्त अशी कविता. कवितेचा प्रतिपाद्य विषय काय असावा याविषयी अनेक विभिन्न मते आहेत. कवितेवर टीपेत म्हटले आहे की उदात्त बुद्धीला संसारात राम नाही. अलौकिक असे तिला जे काही पाहिजे असते ते तिच्या हक्काचे असूनही तिला मिळत नाही. त्याच्या प्राप्ती करता तिला झुरत पडावे लागत नाही काय?

त्रिखंड हिंडुनि धुंडितसे
न परि हरपले ते गवसे

ही त्यांची अखेरची कविता असावी. कवींने दिलेल्या टीपेचा व ध्रुव पदाचा मेळ घालणे सोपे नाही. राजवाडे यांनी वर्डस्वर्थ अमरत्वस्तोत्रातील कल्पना कवितेत आहे असे वाटते असे म्हटले आहे. या इहलोकी येण्या अगोदर आपण देवाकडे असतो व तेंव्हा सुखाला अंत नसतो. पण संसाराच्या जंजाळात ऐहिकाच्या मायामोहात गुरफटल्यामुळे तो प्रकाश ते सुख मावळले आहे, हरपले आहे. म्हणजे परमात्म सुख, ते हरपले आहे. हा अर्थच योग्य वाटतो.

जेथे ओढे वनराजी
वृत्ति तेथे माझी;
कारण काही साक्ष तिथे
मग त्या श्रेयाची पटते
म्हणूनी विजयी मी जाल्ये,
स्वच्छंदे त्या आळांवते
स्वभास दावुनि
परि ते झटदिनी
जाई लोपुनी
मग मी हाका मारितसे !
न परि हरपले ते गवसे !

काव्यातील आशय व अभिव्यक्ती यात अमुलाग्र बदल घडवल्यामुळे त्यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हटले जाते. त्यांच्या काव्यामधून याची सत्यता आपणास निश्चितच जाणवली असेल. सामाजिक रुढी विरुद्ध बंडखोरी, निसर्गाबद्दलचा नाविन्यपूर्ण दृष्टिकोन, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा काव्यातून पुरस्कार. आत्मनिष्ठा,

संवेदनशीलता, समाजाभिमुकता ही लेखन वैशिष्ट्ये. त्यांची भाषा साधारण ओबडधोबड आहे. परंतु त्यांच्या तेजस्वी विचारांमुळे व ओजस्वी उच्चारांमुळे त्यांच्या साध्या काव्यालाच कलेचे सौंदर्य प्राप्त झाले आहे. त्यांनी तालासुरावर वाचता येईल अशा पादाकुलक व बालानंद या मात्रावृत्ताचा सर्रास उपयोग केला.

केशवसुत इंग्रजीच्या इतक्या पकडीत होते की 'कीर्तीचे पीस', 'अज्ञात धडगे', 'निराशेचे अंडे' असे आपल्या परंपरेला सर्वथैव विरुद्ध असे प्रयोग त्यांच्याकडून घडले. त्यामुळे काव्य प्रांतांत जशा काही इष्ट प्रवृत्ती प्रतिष्ठा पावल्या तशा काही अनिष्ट प्रवृत्तीही अकारण बळावल्या. कदाचित बालवयात त्यांना औचित्य विचार नसावा. Poets are mad या इंग्रजी वचनाचा त्यांनी असाच ध्यास घेतलेला होता. आपण उन्मनस्क आहोत, वेडे आहोत, वेडेपीर आहोत, विक्षिप्त आहोत असे चमत्कारिक उद्‌गार त्यांच्या काव्यात अनेकदा आले आहेत. 'आधुनिक मराठी कविता' - भ. श्री. पंडित यांनी म्हटले आहे. त्यांच्या कवितेत आरंभी 'आनंद उत्साह' व 'आशा' यांचा समावेश होता. नंतर प्रतिकूल परिस्थितीमुळे ते 'निराशावादी' बनले. निराशेकडे झुकण्याचे कारण त्यांच्या कवितेत सापडते आणि ते स्वाभाविक आहे.

आर्थिक विवंचनेने ग्रासल्याने, वैफल्यग्रस्त मनःस्थितीत -

'काळोखाच्या जगामध्ये या,
मृत आशांच्या चितावरुनिया।
पिशाच्च माझे भटकत राहे ।
शांति नसेचि तया ।

असे विषण्ण उद्‌गार त्यांच्या मुखाद्वारे बाहेर पडले. 'तुतारी' फुंकून सामाजिक विचार जागृती मात्र केली तरीपण आशेपेक्षा नैराश्याचेच दर्शन त्यांच्या कवितेतून अधिक होते.

इमर्सनच्या विचारांचा त्यांच्या संस्कारसुलभ अंतःकरणावर खोल ठसा उमटला होता. कारण त्यांच्या काव्यातअनुभवाचे सोलीव शब्द आहेत, व्यक्तित्वाचे जसे ठळक प्रतिबिंब आहे आणि मतांचा जसा लयबद्ध युक्तिवाद आहे, तसा तो दुसऱ्या कुण्या कवीच्या काव्यात आढळत नाही.

असा हा अलौकिक प्रतिभेचा कवी १९०५ साली अवघ्या ३९वर्षी प्लेगने गेला. या त्यांच्या स्मृतिशताब्दी वर्षी या कविश्रेष्ठाला ह्या लेखांद्वारे आदरांजली वाहू या.

**- आशा भिडे**

१३/९, विजय अपार्टमेंट,
'आराधना' टॉकिजजवळ,
ठाणे ४०० ६०२.
• दूरध्वनीः २५४१ ०१४०

**केशवसुत - जीवनपट**

७ ऑक्टो. १८६६ - मालगुंड (जि. रत्नागिरी) येथे जन्म
१८७४ - खेड येथे प्राथमिक शिक्षणास आरंभ.
१८८२-८३- बडोदे येथे इंग्रजी शिक्षण.
१८८९- मुंबई विश्वविद्यालयाची मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण.
१८९० ते ९६ - विविध नोकऱ्या
१८९३ - खेड येथे वास्तव्य
१८९६ ते १९००- मडगाव येथे जाणे
१९०० ते १९०३ - फैजपुर येथे वास्तव्य
१९०३ नंतर धारवाड येथे वास्तव्य
७ नोव्हेंबर १९०५ - मृत्यू

# मधु मंगेश कर्णिक यांच्या साहित्यातील महानगरीय संवेदना

*कथनात्म साहित्यात येणारे स्थल, त्याचे स्वरूप व महत्वाचा संदर्भातील हा अभ्यासपूर्ण लेख. मुंबई महानगराचे मधु मंगेश कर्णिक यांच्या साहित्यातील अस्तित्व यावर विचार आला आहे.- संपादक*

महानगरीय संस्कृतीची एक संवेदनाहीन, कोरड्यावृत्तीची आणि अत्यंतिक स्वार्थीपणाची संवेदना या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. ती साकार होते ती विसूच्या आईच्या माध्यमातून. विसूचा जन्म झाल्याबरोबर काही दिवसांनी तिच्या पतीचे-प्रभाकरचे निधन होते. बापाच्या मूळावर जन्माला आलेला पोर म्हणून आई त्याचा राग राग करते. पुढे त्यालाच पोलिओ होऊन तो पांगळा झाल्यावर तिची माया आणखीनच आटते. शरीराच्या गरजा तिला अधिक कोरड्या आणि कोडग्याही बनवतात. एका पांगळ्या मुलाला काय वाटेल, त्याचे मन सावत्र बापाला स्वीकारणार नाही, या विचारांमुळे ती अस्वस्थ होते, पण शारीर गरज त्यापेक्षा जास्त आक्रमक बनते.



श्री. मधु मंगेश कर्णिक

तिचा कोरडेपणा हा फक्त शरीर सुखातुन निर्माण होतो असे नाही तर तिला या पांगळ्या मुलाचा अडसरही होतो. आजोबा तापाने फणफणत असतानाही ती मुलाला त्यांच्या ऐवजी स्वतः हॉस्पिटलमध्ये न्यायला नकार देते. स्वतः शिक्षिका असूनही विसूच्या पुढील शिक्षणासाठी ती काहीही धडपड करीत नाही. जी काय धडपड करायची ती आजोबा करतात. सुवर्णपदक घेण्यासाठी विसूला दिल्लीचे आमंत्रण येते, पण तिकीटाचे पैसे ती नोकरी करत असूनही देऊ करत नाही. ती जमवाजमवी आजोबाच करीत असतात. महानगरीय संस्कृतीतून आलेली ही स्वार्थी, मतलबी वृत्तीच दिसून येते, पण निरुपयोगी झालेल्या माणसांना दूर लोटणारी, अडगळ ठरवणारी ही महानगरीच संवेदना अत्यंतिक -बोचरी असते. कादंबरीभर ठसठसत राहते.

पात्र बनून येणारी गॅलरी, स्थळांना येणारा महानगरीय संदर्भ आणि सख्ख्या जन्मदात्रीला आपल्याच मुलाची वाटणारी अडगळ ही महानगरीय निष्ठूर संवेदना त्रिपेडी गुंफण करणारी 'सूर्यफूल' ही कादंबरी घटनाप्रधानतेला महत्त्व देणरी असली तरी संवेदनांच्या पातळीवर उंचीवर जाणारी कादंबरी म्हणावी लागेल.

कर्णिकांची दुसरी कादंबरी म्हणजे बहुचर्चित **'माहीमची खाडी'**. या कादंबरीत आजपर्यंत खूप चर्चा झालेली असल्याने त्यावर वस्तुतः भाष्य करण्याची आवश्यकता नाही; परंतु महानगरीय संवेदनांच्या संदर्भात या कादंबरीचा विचार करणे आवश्यक ठरते. महानगरातील एका मोठ्या स्थळाचा आणि महानगरीय उच्चभ्रू, श्रीमंत आणि प्रतिष्ठित समाजापासून तुटून पडलेल्या, अलग झालेल्या आणि अलगच ठेवलेल्या वस्तीचे वेगळे समाज दर्शन इथे घडते. या वस्तीतल्या माणसांमध्ये दारिद्र्य आहे, पिचत जाणे आहे. बेकारी, काळे धंदे, दारूचे गुत्ते, जुगार, मटका, उघडानागडा स्त्री-पुरूष संबंध, नात्यांना लागलेला सुरूंग, उद्ध्वस्त कुटुंब व्यवस्था, घरं तुटण्याची टांगती तलवार, कमालीची हलाखीची परिस्थिती आणि तरीही जगण्याची केलेली धडपड, लादलेली बाळंतपणे, डोक्यावर आणून बसवलेल्या सवती, चैनीसाठी झुगारून केलेली नीतीमत्ता,

असे चित्र एका बाजूला आहे तर दुसऱ्या बाजूला आख्खी वस्ती वाचवू पहाणारा या वस्तीचा पितामह सरजू कोळी, अनैतिक वर्तनापासून जीवाच्या आकांताने पोरांना वाचवू पहाणारी आई-गंगाबाई आणि आपला सज्जनपणा टिकवून धरणारा आणि सज्जनपणेच या वस्तीकडे पहणारा दादुमियाँही इथेच सापडतो. या वस्तीतली ही माणसं त्यांच्या जगण्यांतून, वागण्यातून, धडपडीतून, कृतीतून, आचार-विचारांतून विविधांगी संवेदना निर्माण करतात, परंतु या वस्तीची एक विशाल गतीशील महानगराशी जी नाळ लेखकाने वेगवेगळ्या प्रतिकांतून जोडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून महानगरीय संवेदना निर्माण होतात. त्या विचारात घेण्यासारख्या आहेत.

माहीमच्या खाडीतली ही वस्ती तशी महानगरात असून नसल्यासारखी आहे. महानगरात असूनही महानगरासाठी तिचे अस्तित्वच नसल्यासारखं. पण जेव्हा महानगरातल्या श्रीमंत, उच्चभ्रू लोकांसाठी, त्यांच्या वहानांसाठी, सुखसोयींसाठी हायवे बनवायची वेळ येते तेव्हा हे महानगर या वस्तीची दखल घेते आणि बिनदिक्कत वस्तीतील कोणत्याही कुटुंबाची दखल न घेता त्यावर नांगर फिरवते. गोरेगावात बदली घर देण्यात येईल हे सांगितले जाते, पण त्यातला फोलपणा तुटणाऱ्या आणि तोडणाऱ्या सर्वच लोकांना कळून येतो. महानगराला या वस्तीची दखल नसली तरी या वस्तीची नाळ महानगराशी जोडली गेली आहे व ती या वस्तीला मात्र तोडता येत नाही. खाडीत जशी दुनियेची घाण आपोआप वाहत यावी तशी महानगराची घाण इथे येते. अगदी भरती-ओहटीसारखी ही वस्ती हेलकावत राहते. नीती-अनीतिच्या, भीती-विनधास्तपणाच्या हेलकाव्यासारखी, धुसर-स्पष्ट, झगझगीत-धगधगीत महानगरीय प्रतीकांच्या रूपात.

महानगराशी या वस्तीचे नाते असले तरी ते दूरचे, स्वप्नवत असेही राहते. इथून विमानं खूप खालून जातात, पण इथे त्या आयुष्याला स्पर्श न करताच. वरून निघून जातात. गोंगाटाचा, आवाज, प्रदूषणाचा ओरखडा उठवून. वस्तीने फक्त ते जग लांबूनच पाहून समाधान मानायचे. वस्तीला लागूनच असणारा घोडबंदर रोड गतिशील आयुष्याचे आणि वेगवान प्रगतीचे प्रतीक बनून धावत राहतो. या गतीला छेद देण्याची ताकद इथल्या वस्तीत नाही. महानगराला जोडणारा हा रस्ता या वस्तीला जोडून घेऊ शकत नाही. या गतीतून वस्तीनेच आपली वाट काढायची आहे. नाही काढता आली तर मरायचे आहे. महानगराचे जीवन ज्यावर अवलंबून आहे ते पाणी वाहून नेणारी पाईप लाईन जाते ती या वस्तीवरून. एक खळाळतं जीवन धो-धो करत महानगरातल्या घरांतून जाऊन पोहोचतं ते मात्र या वस्तीची घाण टाळून, अगदी सेफ-पायपातून. हे पाईप म्हणजे इथल्या तरुण मंडळींनी कब्जात घेतलेला भाग जरी असला तरी त्यातील पाण्यावर त्यांनी सत्ता येऊच शकत नाही. येणार नाही याची जणू महानगराला खात्रीच आहे. स्वतःला लागणारे पाणी या वस्तीला चोरून, फुटलेल्या पाईपातून घ्यावे लागते. ते तसे घेतले तरी महानगराला त्याची फिकीर नाही. पाईप फुटले तरीही महानगराला पाणी मिळायचे थांबणार नाही, याची खात्री असणारे महानगर बिनघोर आहे. या पायपाचा उपयोग मालविक्री करणारे व्यापारी जाहिरातीसाठी करून घेतात. जाहिरातबाजीला कोणतीच जागा वर्ज्य नसल्यासारखे या जाहिराती रंगवल्या जातात. महानगराला या वस्तीचा उपयोग अचूक कळतो. महानगरातली थिएटर्सही अशीच या वस्तीला आकर्षून घेतात. तेथे येण्यासाठी महानगरातल्या माणसांना फार त्रास नसतो. या वस्तीला मात्र तेथे जाण्यासाठी शरीर विक्रय करावा लागतो, जाहिराती रंगवाव्या लागतात, बहिणीच्या धंद्यातून पैसे चोरावे लागतात. तसे केले तरच महानगरातल्या या स्वप्नाळू जगात वस्तीला प्रवेश करता येतो. महानगरातलं हक्काचं वहान 'टॅक्सी' इथल्या वस्तीला नाकारतं. अडलेल्या

बाईलाही टॅक्सीत घ्यायला नकार देतं. राज कपूर, माला सिन्हा, दिलीप कुमार, वैजंयतीमाला महानगराला भुलवतात. पण वस्तीला त्याची किंमत चुकवावी लागते. बाजूची मोतमावली या वस्तीला शांतता आणू शकत नाही. महानगराला चमचमीत-झणझणीत मेजवानीसाठी मास-मटण पुरवणारा कसाईखाना या वस्तीच्या बाजूलाच महानगरापासून दूर ठेवण्यात येतो. महानगरात कोसळणारा रम्य पाऊस या वस्तीची दाणादाण उडवतो. महानगराची नस जी रेल्वे ती इथल्या वस्तीला शरीर विक्रयासारख्या धंद्यांनी महानगराशी जोडते. पाकीटमारीसारख्या धंद्यासाठी घेऊन येते. चोर म्हणून पकडून देते. लिडो, नेपच्यून सारख्या थिएटरकडे घेऊन जाते. आजूबाजूला असणाऱ्या सिंधी कॉलनीसारख्या कॉलनीत फक्त मोलकरीण म्हणूनच या वस्तीला प्रवेश असतो. महानगराचा शेजार असूनही तो फक्त कामधंद्या पुरताच.

लेखकाने या प्रतीकांतून महानगर आणि वस्ती यांची नाळ जोडली आहे. ती कापायची म्हटली तरी कापली जात नाही व जोडलेल्या रूपात स्वीकारायची तर विदारक जीवनाच्या संवेदना दूर करता येत नाहीत. तरीही 'पाईपलाईन' हे प्रतीक जितके कादंबरीभर फिरत राहते तितकी इतर प्रतीके फिरत नाहीत. ती येतात जातात. त्यांचा परिणाम तीव्रतेने व खोलवर जाणवून देता येण्यासारखा होता; परंतु ती संवेदनांची तीव्रता स्पष्ट व खोलवर निर्माण झाली आहे असे म्हणता येणार नाही. घटनाप्रधानताच या कादंबरीवर वर्चस्व गाजवते. 'माहीमची खाडी' ही गंगा या स्त्रीची कथाच उरते. कुटुंबातला एकेक घटक तिच्या हातातून निसटतो. शेवटी 'रतन' या धाकट्या मुलीलाही तिचाच मुलगा उध्वस्त करतो. घर पडतं. वस्ती सोडावी लागते. हे घरही तिच्या हातून निसटतं. वस्तीही निसटते. एकाकी गंगाच उरते. महानगर जसे या वस्तीला आपले मानत नाही, तसेच ही वस्ती देखील महानगराला दूरच ठेवू पहाते. जो संबंध महानगराशी येतो तो ही वरवरचा, दूरवरचा, परका आणि तटस्थपणाचाच असल्यासारखा वाटतो.

कर्णिकांची तिसरी कादंबरी आहे 'सनद' सचिवालयाचे (आताचे मंत्रालय) विश्व, महामंडळाचा कारभार, प्रशासकीय हालचाली, मंत्री-आमदारांचा वावर आणि वापर, दिल्लीचा वरचष्मा, वजनदार वशिल्याच्या तट्टूंना प्रशासनात मिळणारे स्थान व मान, भ्रष्टाचार, लाचारी लबाडी, हांजीहांजी, खुर्चीचा महिमा, सत्तेची किमया, बिनसलेल्या लोकांना मिळणारी कस्पटासमान वागणूक, सांभाळून घेणारे वरिष्ठ, कंत्राटे मिळवू पहाणारी व्यापारी माणसे, त्यांनी देऊ केलेली प्रलोभने, त्या प्रलोभनांना बळी पडणारे शासकीय कर्मचारी, अंगाशी येणारी प्रकरणे, ती अंगाशी येणार म्हणताच त्यातून सहीसलामत सुटका करून घेणारे वरिष्ठ, बळींचे बकरे, तडफदार अधिकारी, सचोटीच्या अधिकाऱ्यांना दूर करणारे सहकारी, खोटीखोटी भाषणे, विकाऊ आणि मॅनेज होणारे पत्रकार व पत्रकारिता, पात्रता अंगी नसतानाही मिळवलेल्या बढत्या अशा असंख्य वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन घडवणारी ही कांदबरी आहे.

घटनाप्रधानतेला या कादंबरीत स्थान फारसे नाही. महत्त्व आहे ते शासकीय यंत्रणेतील कारभाराला आणि तिथल्या माणसांना आणि त्यांच्या एकूणच बेरक्या आणि पाताळयंत्री कर्मचाऱ्यांना. या कादंबरीला महानगरीय पार्श्वभूमी आहेच, परंतु हे महानगर राज्याच्या राजधानीचं शहर आहे. यातलं महानगर 'मुंबई' हेच शहर आहे. साऱ्या राज्याचा कारभार ज्या महानगरातून चालतो व त्या शहरातल्या जनसामान्यांना हा कारभार कसा विचारात न घेता बेमालूमपणे त्याला जसे व्हायला हवे तसेच कसे घडवून आणतो हे या कादंबरीत उत्तम प्रकारे व्यक्त झाले आहे.

कागदी घोडे नाचवणारी ही यंत्रणा आहे. रडणाऱ्या, भित्र्या वृत्तीला इथे थारा नाही. कुरघोडी करू

शकणारा इथे शेर आहे. महानगरातील इतर समस्या, लोकांचे प्रश्न, सोयी-गैरसोयी यांना या प्रशासकीय यंत्रणेत फारसे स्थान नाही. सत्तेपुढे झुकणे व झुकवणे इतकेच ज्यांना कळते त्यांच्या संवेदनांना इथे महत्त्व. महानगराला किंमत न देणारी संस्कृती यातून उलगडत जाते. वापरा आणि फेका, 'फोडा, झोडा आणि मतलब साधा' ची संस्कृती इथे आहे. कोणत्याही प्रकारे काम पूर्ण करून घ्यायचे. त्यात नीती-अनितीची पर्वा नको.

या कादंबरीत व्यक्त होणारी संवेदना महानगरीय संवेदना असण्यापेक्षा महानगराला पुरवठा करणारी संवेदना इथल्या स्थळामध्ये जन्माला येताना दिसते व ती नंतर महानगरात फैलावते. महानगराला 'मॉडेल' पुरवते. इतर व्यक्ती, संघटना, संस्था त्यांचा कारभार यांना प्रेरणा देते. महानगराला आपल्या संस्कृतीनुसार वागायला शिकवते. या कादंबरीच्या केंद्रस्थानी असणारी ही संस्कृती-संवेदना प्रभावीपणे लेखकाने मांडली आहे यात शंका नाही.

आता आपण कर्णिकांच्या एका दीर्घ कादंबरीचा विचार करू या. 'संधिकाल' ही त्रिखंडात्मक कादंबरी आहे. 'पन्नास वर्षापूर्वीच्या मुंबईचं मराठीपण झपाट्याने मागे सारत निर्माण होणारं नवंच कॉस्मोपॉलिटन महानगर आणि त्याच वेगाने अपरिहार्यपणे बदलणारी राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती' मांडणारी त्रिखंडात्मक कादंबरी आहे असे पुस्तकावर नमूद करण्यात आले आहे. 'एका परीने या शतकाच्या उत्तरार्धातील मराठी मध्यमवर्गीयांचा, आपली संस्कृती व मूल्ये जपत जगण्यासाठीच आणि या नव्या विस्मयकारक बदलात टिकून राहण्याचा संघर्ष' आहे असेही पुस्तकावर खास नोंदवण्यात आले आहे.

या कादंबरीवर खरं तर स्वतंत्रपणे लिहायला हवे. याचा कालपट मोठा तर आहेच; परंतु त्यात येणारे संदर्भ व दाखले आणि प्रत्यक्षातलं वास्तव यांचा तौलानिक अभ्यास इथे अपेक्षित आहे. तसा अभ्यास केला तरच हा संघर्ष खरोखरचा संघर्ष आहे की नाही याचा अंदाज येऊ शकेल. प्रस्तुत निबंधात तो अभिप्रेत नसला तरी स्थळ संस्कृती व संवेदनांच्या संदर्भात तो करायला हवा.

सदर कादंबरीला मुंबई महानगराची पार्श्वभूमी आहे. स्थळांचा विचार करता यामध्ये प्रामुख्याने गिरगावातल्या म्हापसेकरांच्या चाळीत पहिल्या खंडातले कथानक घडते. भिकाजी आरस या मध्यमवर्गीय कारकुनाच्या घरचे दोन खोल्यांचे वातावरण आणि त्याची वाढती जाणती मुले इथे वावरतात व मोठी होतात. चाळी बाहेरची मुंबई एसके नावाच्या पात्रामुळे दिसत राहते. दुसऱ्या खंडात प्रामुख्याने विलेपार्ले आणि जुहुस्कीम या स्थळा भोवती कथानक घुमत राहते. मधेच दिल्ली येते, पण तेवढीच, श्रीमती गांधी, यशवंतराव चव्हाणांना भेटण्यापुरती. तिसऱ्या खंडात गिरगाव, मंत्रालय आणि पार्ले व इतर कांही मुंबईतील भाग येतो, परंतु यात जास्त प्रभाव आहे तो कामगार वस्तीच्या चाळींचा.

या त्रिखंडात्मक कादंबरीचा काळही मोठा आहे १९४७ साली कादंबरी प्रारंभ करते आणि मुंबईतील १२ मार्च १९९३ रोजीच्या बॉम्ब स्फोटाच्या घटनेपाशी कादंबरी संपते. तसा या कादंबरीतील काळ १९४७ च्या मागेही नेण्याचा प्रयत्न कादंबरीकाराने केला आहे. भिकाजी आरस यांना आपल्या वडीलांच्या डायऱ्या सापडतात आणि त्यामुळे १९८८ ते १९२८ हा कालखंड व त्या कालखंडातील घटना कादंबरीत मधेमधे डोकवतात. १९२८ साली भिकाजी आरस यांचे वडील मरण पावतात व त्याच वर्षी त्यांचे लग्नही होते. १९२८ ते १९४७ हा कालखंड कादंबरीत नाही.

या कादंबरीत खेतवडी येथील कम्युनिस्ट पार्टीचं ऑफिस, संघाची शाखा, कॉम्रेड रणदिवे यांचा तेलंगण लढा, रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीचे स्टडी सर्कल, भाई जीवनजी लेनमधील प्रजा समाजवादी पार्टीचं कार्यालय,

आरएल ट्रस्ट, भूदान चळवळ, गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र लढा, '२१ नोव्हेंबरचा मोरारजींचा गोळीबार, आणीबाणी, जनता सरकार, जनता सरकारचे कोसळणे, दत्ता सामंतांचा गिरणी कामगारांचा संप, इंदिराजींची हत्या काँग्रेस पार्टीचं ऑफिस, शरद पवारांचे राजकारण, शिवसेना, स्त्रीमुक्ती चळवळ, गँग वॉर इत्यादि अनेक राजकीय संदर्भ कादंबरीत येतात. हे सारे संदर्भ प्रामुख्याने एसके या पात्रामुळे येतात. काँग्रेस पार्टी, मंत्रालय, इंदिराबाई यांचे संदर्भ मोहिनी (प्रसाद-भिकाजी आरस यांच्या पुतण्याची बायको) या पात्रामुळे कादंबरीत येतात.

इतक्या दीर्घ कालखंडाची आणि इतके राजकीय संदर्भ असणारी जरी ही कादंबरी असली तरी ती कौटुंबिककथाच राहते. इथले महानगर हे या कादंबरीचे महत्त्वाचे स्थळ असले तरी कथानक पुढे जाण्यापुरतेच ते इथे भेटत राहते. राजकीय संदर्भ उपरे आणि घुसवलेले जाणवतात. मध्यमवर्गीय संस्कृती अधोरेखित करण्याच्या प्रयत्नामुळेही हे घडले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मध्यमवर्गीय क्रियाशील न होता फक्त बोलणारा असतो हे दाखवण्याच्या क्रियेचा हा परिणाम असावा. ही त्रिखंडात्मक कादंबरी महानगराची कथा न होता, महानगरातील कथा होते.

गिरगावसारख्या महत्त्वाच्या स्थानातील कलात्मक, सांस्कृतिक वातावरण इथे येत नाही. उदा. ऑपेरा हाऊस, साहित्य संघ, ब्राह्मण सभा, संग्रहालय इथली व्याख्याने, संगीत मैफिली, गणेशोत्सव, इत्यादि. किंवा इथली हॉटेल संस्कृती, इराणी संस्कृती, इथली थिएटर्स अथवा साहित्य संस्कृती. हा सारा माहोल या कादंबरीत येत नसल्याने गिरगावाचे खरे दर्शन घडत नाही. म्हापसेकरांच्या चाळीत कथानक घडत असूनही गिरगावातल्या चाळसंस्कृतीची इथे वानवा जाणवते. गोवामुक्तीचा लढ्यात पडूनही एसकेच्या मनाची तडफड कुठेच कादंबरीत उमटत नाही. संयुक्त महाराष्ट्र लढाही असाच नावापुरता येतो. आला नाही तर चालणार नाही म्हणून हा संदर्भ येतो. सर्वच संदर्भ असेच उपरे आणि नावापुरते आहेत. उदा. पद्मनाभाचा व्यवसाय बिल्डरचा असूनही तो खंडणी, धमक्या, बनवाबनवी नि मुक्त राहतो. फक्त घोटाळतो तो वशिला व भ्रष्टाचारा भोवतीच.

या कादंबरीत अवास्तव मुद्देही बरेच आहेत; परंतु त्याची चर्चा इथे करणे प्रस्तुत ठरणार नाही, कारण ते विषयांतर ठरेल. मात्र उदाहरणे एक-दोन देतो. एसके, मालती, सदानंद ही एकाच पिढीतील तरुण मुले. एसके तर एम्. ए.; मालतीला नोकरी लागते (तिच्या मावशीला-सुलीला-आधीच नोकरी आहे.) सदाला लागते पण एसकेला मात्र लागत नाही. १९४७ सालातील बेकार पिढीचा (एसके) प्रतिनिधी रंगवण्याच्या खटाटोपात लेखक वास्तव विसरतो. १९४७ - ४८ वा ५० सालात सुलीमावशी, राधिका (पद्मनाभ-भिकाजीचा मोठा भाऊ-ची रखेल) या विवाहबाह्य संबंध ठेवतात हे कितपत वास्तवाला धरून आहे? असो.

महानगरीय संवेदनांच्या संदर्भात प्रस्तुत कादंबरी उथळ वाटत असली तरी मध्यमवर्गीय वर्गाची आलिप्तता, कोरडी चर्चेची आसोशी आणि क्रियाशून्य शेरेबाजीची संवेदना एसके या पात्राच्या मुखातून अचूक मांडण्यात आली आहे. विशेषतः एसकेला वर्तमानपत्राच्या संपादक पदाची ऑफर येते तेव्हा त्या पत्राच्या मालकवर्गाबरोबर झालेल्या चर्चेत या मध्यमवर्गीय संस्कृतीचे प्रतिबिंब पुरेपूर वास्तवदर्शी उतरले आहे. या कादंबरीतील बहुसंख्य पात्रे मध्यमवर्गातील असल्याने त्यांची अलिप्तवृत्ती जागोजाग सापडते हे या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल, परंतु त्याच्या मागे महानगरीय संस्कृती आहे असे नाही. ही मध्यमवर्गाची वृत्ती व संस्कृती कुठेही अशीच असते. अशाच प्रकारात सापडते.

चार

मधु मंगेश कर्णिक यांच्या काही साहित्यकृतींच्या संदर्भात महानगरीय संवेदना कशा जाणवतात ते वर आपण पाहिलेच. आता प्रश्न उरतो तो हा की महानगरीय संवेदनेबाबत इतरांची मतं काय आहेत ? 'मराठी कवितेतील महानगरीय संवेदन' नावाचा एक लेख रा. ग. जाधव यांनी 'काही नोंदी-काही निरीक्षणे' या पुस्तकात समाविष्ट केला आहे. त्यात ते म्हणातात की, ''महानगरीय संवेदनांची सर्जनशील यथार्थपणे लक्षात येण्यासाठी अनेक संदर्भसाधनांची सिद्धता होणे आवश्यक आहे. एक म्हणजे मुंबई, पुणे, सोलापूर, नागपूर यांसारख्या महानगरांच्या वाढी-विकासाचा नेटका सर्वांगीण इतिहास निर्माण व्हावयास हवा. या महानगरांचा समाजशास्त्रीय अभ्यास करावयास हवा. त्याचप्रमाणे महानगरीय वास्तवात जन्मलेल्या व वाढलेल्या कवींच्या व्यक्तिमत्त्वांचाही अनेकांगी वेध घेणे उद्बोधक ठरेल. या खेरीज आधुनिकता, आधुनिकीकरणाची प्रक्रिया व या दोहोंशी आपली देशीयता व सातत्याची परंपरा यांचा असलेला द्वंद्वात्मक प्रगतिशील संबंध यांचाही अभ्यास होणे इष्ट ठरेल. थोडक्यात, मराठीतील महानगरीय संवेदनांचे रूपबंध केवळ कलात्मक संदर्भातच नव्हेत; तर सांस्कृतिक संदर्भात समजावून घेण्याची गरज आहे.'' (पृ. ३२)

रा. ग. जाधवांची ही अपेक्षा रास्तच आहे. सांस्कृतिक-सामाजिक इतिहासाची वानवा आपल्याकडे कमालीची आहे. असा इतिहास उपलब्ध असला तर समीक्षकांची सोय झाली असती. कलाकृतींचा नेमकेपणाने वेध घेता आला असता.

महानगरीय वास्तव रेखाटणाऱ्या लेखकांची गोची नेमकी कुठे आहे ते दिलीप चित्रे यांनी 'चाव्या' या त्यांच्या पुस्तकात अचूकपणे पकडली आहे. ते लिहितात-

''... शहरातल्या जीवनाची संघटना गुंतागुंतीची असते आणि आधुनिक जीवनाच्या घडणीतच शहरी अस्तित्वाला, शहरातल्या जीवन लढ्याला महत्त्व आलंय, पण शहरातलं वातावरण, तिथले गर्दीतले व्यवहार, तिथला अनामिकपणा, तिथली रेल्वे स्टेशनं, हॉस्पिटलं, जुन्या-नव्या वस्त्या, रस्ते - मोहल्ले, झोपडपट्ट्या- कचरापट्ट्या, कुंटणखाने, कायदेशीर आणि बेकायदा व्यवहार ह्या सर्व गोष्टी प्रचंड कच्च्या मालासारख्या मराठीत अजून पडून आहेत. मुंबईत माणसं जशी आपआपल्या कप्प्यांत राहतात, खंडप्राय सामाजिक जीवन जगतात, तुकड्या-तुकड्यांनी वैयक्तिक अस्तित्व जुळवतात, तसलेच तिथले लेखक कप्प्यांत बसून लिहितात. मराठीतलं हे एक चालू आश्चर्यच आहे.'' (पृ. २९-३१)

दिलीप चित्र्यांनी अचूक हेरलेले हे लेखकांचे कप्पे महानगरीय संस्कृतीच्या संवेदना तपासताना अनेक लेखकांच्या बाबतीत दिसून येतात. मध्यमवर्गीय संस्कृतीच्या कप्प्यांतून सुटका करून न घेता आलेल्या लेखकांच्या साहित्यात जीवघेण्या गर्दीत घुसमटलेला जीव दिसत नाही. बिल्डर लॉबीने गोची केलेला तरुण सापडत नाही. शासनयंत्रणेने नागवलेला वृद्ध येत नाही. रस्त्यांमधील खणाखणी, खड्डे, पावसाची डबकी, तुंबलेली गटारे आणि अडकलेल्या रेल्वे गाड्या, रेल्वेतील मरणप्राय गर्दी व त्या गर्दीला छेदून कसाबसा प्रवास करणारा प्रवासी, पाकीट मारल्याने हताश झालेला चाकरमानी, गर्दीचा फायदा घेणारा लंपट माणूस अशा अनेक रूपात महानगर महाकाव्य विक्राळ झाले आहे. येणारे लोंढे आणि त्यांना पाठीशी घालणारे मतलबी राजकारणी, बलात्कार करणारे पोलीस, एन्काऊंटरमध्ये मरणारे निष्पाप जीव, स्त्रियांवरचे वखवखलेले डोळे, कॉलेज-शाळेत प्रवेश न मिळालेले तरुण, गुटका खाणारी पोरे, जाहिरातींचा मारा करणारी चॅनेल्स, वृत्तपत्रे, ट्यूशन क्लासेस आणि वैद्यकीय -

अभियांत्रिकी शाखेसाठी चाललेली जीवघेणी स्पर्धा, वरवरचे उथळ तत्त्वज्ञान, जगण्यासाठी घेतलेली सोंगे व मुखवटे, कचेरीतली लाचारी आणि भ्रष्टाचारातून फोफावलेली लाट संस्कृती, बारबाला, एडस्, रोग, हरवलेलं मानसिक स्वास्थ्य, देवळासमोरच्या रांगा, अंधश्रद्धा, बुवाबाजी अशा नानाविध मार्गांनी महानगरं बदलून गेली आहेत. मराठी लेखक या वास्तवाला कधी सामोरा जाणार ?

कर्णिकांच्या साहित्यात येणारं महानगर हे मध्यमवर्गीय नजरेनं टिपलेलं महानगरच आहे. अगदी 'माहीमच्या खाडीत' ही झोपडपट्टीच्या बाहेरचं जग अभावानेच उतरतं. '**संधिकाल**' मध्ये तर यासर्व थरांना स्पर्शही केला जात नाही आणि म्हणूनच त्यांच्या कथा-कादंबऱ्यातल्या स्त्रियांना केवळ पुरुषच हवा असतो. हीच त्यांची समस्या असते आणि त्यांचे पुरुषही केवळ शारीर सुखाचाच विचार करतात. स्वप्नरंजन इतकं असू शकतं याचं भान आणून देणारं साहित्य केवळ घटनाप्रधानतेकडेच झुकतं. महानगरीय संस्कृतीतला एकच एक तुकडा उचलून उलट-सुलट, आडवा-तिडवा, उभा-बसका दाखवण्यात कर्णिक धन्यता मानतात. तो तुकडा म्हणजे मध्यमवर्गीयांना महानगराबाबत जाणवलेला 'परकेपणा'. हा परकेपणा ही इथे 'नस' जुळणाऱ्यांच्या बाबतीत दिसून न येणारी बाब, महानगरात पोटापाण्यासाठी उपरे म्हणून येणाऱ्यांच्या बाबतीत प्रकर्षाने दिसून येते. महानगरीच्या घडणीत ज्यांचा सहभाग नाही, त्यांना त्या नगराबाबत आपलेपणा वाटणे शक्य नाही. जशी ती इथल्या उपऱ्या रहिवाश्यांना वाटत नाही, तशीच ती वर्षानुवर्षे राहूनही, लेखकांनाही वाटत नसावी. कर्णिक, दळवी, पेंडसे, भेंडे इत्यादींच्या तुलनेत भाऊ पाध्ये वेगळे ठरतात ते त्याच मुळे.

महानगरीय संवेदना लेखकाची संवेदना प्रथम व्हावी लागते व ती तशी झाली तरच ती साहित्यात उतरू शकते. प्रथम नाळ जोडूनच जन्म व्हावा लागतो, नाळ कापूनच काढलेली असावी लागते, तर ते नाते प्रस्थापित होते. अन्यथा ते उपरेच राहते.' सनद', 'सूर्यफूल' मध्ये त्या संवेदना पकडू शकणारे लेखक 'माहीमची खाडी' व 'संधिकाल ' मध्ये उपरेच जाणवतात. हे महानगराचं अपयश नसनू महानगराशी नातं न जुळण्यातलं अपशय म्हणून नोंदवावं लागेल.

**डॉ. प्रदीप कर्णिक**
फ्लॉवर व्हॅली, ३०१, टॉवर नं. १,
नारळीपाडा, ठाणे-१.
दुरध्वनीः २५४७ ६१४५

### ग्रंथालय शास्त्र - उद्‌घाटन

जोशी बेडेकर महाविद्यालयातील मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या बी. लिब. २००५-२०६ या वर्षाचे उद्‌घाटन आय.आय.टी. मुंबईचे ग्रंथपाल श्री. दौलत जोरवानी यांच्या हस्ते ४ जुले २००५ रोजी झाले. या वेळी प्राचार्य गोखले अध्यक्ष स्थानी होते.

या वर्षीची ही ५वी तुकडी असून या वर्गाचा निकाल उत्तम लागत आलेला आहे. यंदाचा निकालही ८१% इतका आहे.

दिशा
नियमीत
वाचा

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधने

*वैश्विक रचना, विश्वसंकल्पना यांच्या दृष्टीने भारतीय संस्कृतीचा विचार मांडणारा हा चौथा लेख. विषयाची संगती लागण्याच्या दृष्टीने वाचकांनी हे सर्व लेख एकत्रित ठेवावेत ही विनंती - संपादक*

(भाग ४)

**संस्कृतीची शास्त्रीय बैठक :**

'दिशाच्या' मागील काही अंकातून आपण थोडीशी पुसटपणे भारतीय संस्कृतिच्या बीजाची, मॉडेलची, साधनांची व त्यांची वेदांशी असलेली नाती पाहिली. तसेच 'संस्कृति' ह्या शब्दाची जी एक ढोबळअशी व्याख्या व संकल्पना आहे, त्या 'संस्कृती' ह्या महत्त्वाच्या संकल्पनेला एक 'शास्त्रीय' बैठक हवी असा 'हट्ट' धरला.

**वेदिक संस्कार :**

याखेरीज एखाद्या संस्कृती व संस्कार करण्याची प्रक्रिया ह्या संदर्भात भारतीय संस्कृतीतील वेदांच्या ज्ञानाचा कसा आधार आहे हेही सांगण्याचा प्रयत्न केला.

**'देश व जाती' :**

तसेच एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचा या पृथ्वीवर उगम, प्रसार व वृद्धी व समृद्धि व्हावयाची असेल तर त्याला मानवी जीवनाचा, 'देश व जाति'-संज्ञा. (दैशिकशास्त्रीय संज्ञा) ह्यांच्या वैश्विक, प्रकृतिमधील, पृथ्वीवरील सातत्याचा आधार का लागतो त्याचीही चर्चा केली.

**जीवन मूल्ये**

आता, या लेखात 'भारतीय संस्कृतीचा रसयुक्त गाभा व जीवनमूल्यांचा खजिना कसा व कोणत्या शास्त्रीय बैठकीवर प्राप्त झाला याचा विचार करूया.

**संस्कृतीच्या स्वरूपाचे अज्ञान :**

त्या अगोदर 'संस्कृती' ह्या शब्दाबद्दल किंवा संकल्पनेबद्दल किती निरनिराळे अर्थ, भोंगळपणा व आपआपल्या देशांतीलही 'भेळपुरी प्रकाराला' संस्कृतीचे 'लेबल' लावण्याचे (राजकीय हेतूंच्या) क्रिया चाललेल्या आहेत, त्या पाहू या. ह्याचे स्पष्ट कारण म्हणजे 'भारतीय संस्कृती' म्हणजे काय हे समजण्याकरिता व तिची थोरवी व श्रेष्ठता समजण्याकरिता आपआपल्या अभिनिवेशी चष्म्यातून सगळे जग ज्या चुकीच्या भूमिका घेत आहेत, अशास्त्रीय भूमिका घेत आहे, ते प्रथम ज्ञात होणे, जरूरीचे आहे.

ह्या विश्लेषणाला सामोरे जाण्याचे धाडस राजकारणी मंडळी करु इच्छित नाहीत. का? 'Let the sleeping dogs lie' 'झोपलेल्यांना झोपू द्या' हा धूर्त व मतलबी 'स्वार्थ' ह्या मागे आहे. आपला 'मतदार संघ' अज्ञानावर जोपासण्याच्या 'चातुर्याचे' हे लक्षण आहे व हाच राजकीय चष्मा ते विचारवंतावर लादू इच्छितात. हा मार्ग 'least resistance' वारा येईल तशी पाठ देणाऱ्यांचा आहे !! ह्याच प्रकारामध्ये निरनिराळया धर्मांची, तत्वज्ञानाची आयडिऑलॉजीची अभिनिवेशी मंडळी आपल्या एकांगी व अपूर्ण विचारांची दुकाने व ग्रंथ मांडून बसलेली दिसतील. बात भर म्हणजे भारतीय संस्कृतीच्या विशेष अभ्यासाला खुद्द हिंदू व तत्सम परिवार अनुत्सुक आहे.

'संस्कृती म्हणजे काय?' संस्कृती ह्या संकल्पनेबद्दलच संभ्रम आहेत - इतके निरनिराळे अर्थ

आहेत की त्यांचा थोडासा परिचय झाला की भारतीय संस्कृतीची जी 'सुप्त जाणीव', ह्या देशांत जन्माला आलेल्या व ह्या देशांतल्या, पाणी, वनस्पती,नद्या डोंगर, प्राणी, पक्षी त्यावर वाढलेल्या, प्रत्येक जीवाला भारतीय संस्कृतीच्या ह्या वैशिष्ट्यांची जाणीव अगदी आपोआप स्फुरु लागेल.

**परकीय व्याख्या :**

जॉन एच्. बोडले (John H. Bodly) हे वॉशिंग्टनच्या डिपार्टमेंट ऑफ अँथ्रॉपालॉजी (मानववंशशास्त्र) चे 'चेअरपर्सन' आहेत. त्यांच्या 'सांस्कृतिक मानवशास्त्र' ह्या ग्रंथात त्यानी संस्कृतीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

**Table : Divers Definitions of Culture:**

| | |
|---|---|
| **Topical** | Culture consists of everything on a list of topics, or categories, such as social organization, religion, or economy. |
| **Historical** | Culture is social heritage, or tradition, that is passed on to future generations. |
| **Behavioral** | Culture is shared, learned human behaviour, a way of life. |
| **Normative** | Culture is ideals, values , or rules for living. |
| **Functional** | Culture is the way humans solve problems, of adapting to the environment or living together. |
| **Mental** | Culture is complex of ideas, or learned habits, that inhibit impulses and distinguish people from animals. |
| **Structural** | Culture consists of patterned and interrelated ideas, symbols, or behaviors |
| **Symbolic** | Culture is based on arbitrarily assigned meanings that are shared by a society. |

Culture involves at least three components : what people think, what they do, and the material products they produce. Thus, mental processes, beliefs, knowledge, and values are parts of culture. Some anthropologists would define culture entirely as mental rules guiding behavior and what people actually do. Consequently, some researchers pay most attention to human behavior and its material products. Culture also has several properties : it is shared, learned symbolic, transmitted cross-generationally, adaptive and integrated.

कोणते प्रश्न उभे रहावेत ? ह्या यादीत 'धर्म' आहे - म्हणजे प्रचलित अर्थाने - 'रिलीजन', पण, भारतीय अर्थाने 'स्पिरीच्यूअल' धर्म- म्हणजे ज्या मार्फत आत्म्याची गुणात्मक वृद्धी किंवा 'संस्कृती ' व्हावी, हा विषय नाही.

जॉन ब्रोडले म्हणतात, 'Culture is learned, not biologically inherited'. हे विधान विवाद्य आहे !! जर असे असेल तर, भारतीय सांस्कृतीतील 'गर्भदान' व 'अंत्येष्टी' संस्कारांना अर्थच राहणार नाही.ह्या उलट भारतीय संस्कृतीची भूमिका आहे. एक तर संस्कृतीचे 'बीज' आपल्या बरोबर घेऊनच ह्या जीवाचा भारतीय विशिष्ट 'जाति' गुण घेऊन पृथ्वीवर प्रकृतिने व आई, वडिलांनी-दिलेल्या शरीरांत, जन्म होतो. ह्या जन्मात भारतीय संस्कृतीचा वारसा व तिचा 'ऋणी' व 'पाईक' म्हणून त्या जीवाला 'पुरुषार्थ' साधावयाचा असतो. त्यामुळे ह्या Spiritual Culture आध्यात्मिक व वैश्विक संस्कृतीचा अभ्यास, एका अंगाने जन्मजन्मांतरीच्या सांस्कृतिक खजिन्याचे स्मृतिजागरण व अशाच प्रवृत्तीच्या इतर भारतीय घटकांसमवेत ह्या पृथ्वीवर त्या संस्कृतीचा अविष्कार व फुलोरा करण्यास प्रारंभ होतो. त्याचबरोबर स्वतःच्या सृजनकलेच्या सामर्थ्यावर त्या 'संस्कृतिधनांत' स्वतःची अशी - पण, प्रकृति व समाजाच्या मदतीनेच वैशिष्ट्यपूर्ण भर घालणे असा हा त्याचा जीवनमार्ग असतो. कालिदास, भर्तृहरी, बाणभट्ट ह्यांचे साहित्य, अजंठा वेरूळ

व बुद्धाची शिल्पे व लेणी, भरतनाट्य, कथ्थक, मणीपुरी, कथकली ह्यांतील नृत्ये, तानसेन, हरिशास्त्री व इतर अनेक संगीत विशारद व वादक-रवी शंकरची सतार, रवी वर्माची चित्रे ही मालिका काय दर्शवते ?

त्यामुळे जॉन बोडले यांना जो एक प्रश्न पडला आहे की जर ही 'Super organic interpretation of Culture' म्हणजे संस्कृतीचा 'पारमार्थिक' किंवा मानवी देहाच्या पलीकडील वैश्विक संबध व असा अर्थ संस्कृतीचा लावला तर 'मानवी स्वातंत्र्य' ('Free will') ला काहींच अर्थ रहाणार नाही. पण, हा त्यांचा समज चुकीचा आहे ह्या मुद्यावर पुढे भाष्य करुच.

त्या उलट Kroeber आणि Leslie White ह्या पाश्चात्य विचारवंतानी जो विचार मांडला आहे तो आपल्या संस्कृतीविषयक संकल्पनेशी जुळणारा आहे. तो त्यांच्या टीकाकारांच्या भाषेतच वाचणे जास्त संयुक्तिक ठरेल.

" The cross-generational aspect of Culture has led some anthropologists krober (1917) and Leslie White (1949) to treat culture as a 'Superorganics entity', existing beyond its individual human carriers. Individuals are born into and are shaped by a 'preexisting culture' that continues to exist after they die. Kroeber and white argued that the influence that Specific individuals might have over culture would itself be largely determined by culture/ Thus, in a sense, culture exists as a different order of phenomenons that can be explained in terms of itself."

**वेदांची भौतिक प्रतीक भाषा :**

वेदामध्ये कित्येक वेळा निसर्गातील क्रिया किंवा तत्त्वे ह्यांचा आधार 'आध्यात्मिक क्षेत्रांत' किंवा अव्यक्त (unmanifest world) जगातील नियमांना त्यांच्या सत्यतेबद्दल किंवा 'Praxis' म्हणून देण्याचा प्रघात दिसतो. कारण उघड आहे. जर तुमच्या भौतिक जगात एखादे 'तत्त्व' तुमच्या दर्शनात आले, अनुभवात आले तरी ते 'तसेच' किंवा 'आणखी व्याप्त स्वरुपात' व 'अव्यक्त जगांतच' ते 'बीज स्वरूपात' असते आणि हे ज्ञान जाणिवेने आणण्याचा तो भौतिक प्रयत्न असतो.

त्यामुळे, रत्नागिरीच्या हापूस आंब्याला ज्या एका रसयुक्त विशिष्ट चवीचे संदर्भ आपण देतो, त्या अर्थाने, भारतीय संस्कृतीलाही, इतर मानवी संस्कृतिची उदाहरणे - जिवंत व मृत ह्यांच्या तुलनेने - आपण एक निराळे, अलग वैशिष्ट्य बहाल करु शकतो. आता या आंब्याचे वैशिष्ट्य त्याच्या बीजांत आहे व रत्नागिरीची जमीन, पाणी वातावरण हे त्याला पोषक व आधारभूत आहे - Compatible आहे. अनुरुप, मेळ घालणारे आहे.

**अबीद हुसेनांचे नॅशनल कल्चर :**

पण अबीद हुसेन ह्यांच्या 'The National Culture of India' ह्यात सुचवलेली 'भारतीय संस्कृती' ही Hybrid म्हणजे मिश्रजातीय अकरमाशी किंवा 'भेळपुरी संस्कृती' होय. कारण विविध मानवी संस्कृतीमध्ये जर 'आध्यात्मिकता, जीवन मूल्ये, मानवी जीवनाची वैश्विक आदर्श, विश्वसंकल्पना - सत्य व ऋत तत्त्वे वगैरे संदर्भांना मौलिक भेद असतील तर तिच्या वरपांगी आविष्कारातही ते दोष उतरणारच. 'बीज' कलुषित होणार - कारण हा जन्मजन्मांतरीच्या शुद्धीचा, सुसंस्कृतीचा प्रवाह आणि स्त्रोत आहे. त्याची सुसंगतता ही विश्वनिर्मीती व त्यातील गूढ, अगम्य पण अत्यंत उदात्त अशा तत्वांशी बांधलेली आहे. वेदांची शुद्धी ज्या आत्मियतेने, स्वार्थत्यागाने गेले १०,००० वर्षे ज्या समाजाने बाळगली, संभाळली त्यांच्या त्यागावर पाणी ओतण्याची क्रिया होईल, नव्हे का?

निसर्गातही अशा तऱ्हेची विसंगत कृती दिसते. काजू (Cashewnut) फळाचे बीज हे त्या फळाबाहेर व उलटे दिसते, आणि फळ चवीने तुरट लागते. त्यामुळे फळाच्या ऐवजी बीज खाणे आपण पसंद करतो. का बरे ?

पाश्चात्य विचारवंतांनी एकदा का 'सेक्यूलर' म्हणजे निरीश्वरवाद, अध्यात्मवादाला विरोध व भौतिकतेला सार्वभौम सत्तेचे स्थान दिले की ते मानवाला ईश्वर, परमेश्वर बनवून टाकतात. ह्या पृथ्वीच्या बाहेर एक अफाट विश्व आहे त्याच्या अनाकलनीय अश्या अस्तित्वाचा व शक्तीचा विसर पडला कीं एक तऱ्हेचा पोकळ व अवास्तव मानवी अहंकाराची विचारधारा प्रसवू लागते. ती unreal, unfounded असत्य, पायाहीन अशी असते. मानवाच्या स्वतःच्या मर्त्य अस्तित्वाचा खरा अर्थ व स्वतः 'मी कोण आहे' याचा थांगपत्ता नसताना व स्वतःच्या जन्म, मृत्यू व दैहीक जीवनव्यापारावर - अगदी श्वासक्रियेवरही जो निसर्गाचा Mandatory अंमल असतो त्याचा विसर पडलेला असतांना - मानवी संस्कृतीच्या खऱ्या 'बीजाबद्दल' तो अज्ञानीच रहातो. ह्या संस्कृतीच्या वाटचालीवर व तिच्या गुणवत्तेबद्दल कांही नैसर्गिक, ईश्वरी योजना असू शकेल हे तो मान्य करत नाही. त्यामुळे भारतीय संस्कृतीच्या 'दैवी गुणांबद्दल' तो साशंक असतो. पण, मग इतर संस्कृतींबद्दल कुठचेही पृथक्करण न करतां, हा पाश्चात्य विचारधारेतील विद्वान 'Multi-Cultural' प्रमेय मांडतो. आणि मग अशा 'तात्विक मांडणीला' कोणताही शास्त्रीय आधार नसतांना 'राजकीय हेतू 'प्रमाण' मानणारे' धूर्त पुढारी आपल्याला हवा तसा 'संस्कृतीचा आकार' ह्या समाजाला 'दैवी भारतीय संस्कृतीला' देण्याचा प्रयत्न चालवतात.

**दैशिक शास्त्र जन्मसिद्ध संस्कृति :**

ह्या संदर्भात 'दैशिक शास्त्र' ह्या श्री. सोंबारी हमाराज यांच्या 'जाति' ह्या विशिष्ट संज्ञेचा विचार योग्य वाटतो. भारतांत जन्माला येणारा प्रत्येक जीव सर्वसाधारणपणे एक सूप्त जीवनहेतू व संस्कार घेऊनच जन्माला येतो हा तो विचार !! 'सर्वसाधारण', हा शब्द, ह्या अर्थाने वापरला आहे की याला अगदी थोडे 'अपवाद' 'Natural Error' ह्या न्यायाने असू शकतील. ज्याप्रमाणे दोन डोकी किंवा तीन हात घेऊन माणूस जन्माला येत नाही. ६ किंवा ७ बोटे हातापायाला नाहीत, पण एखादी चूक निसर्गाकडून होऊ शकते.

धर्माची व्याख्या अशास्त्रीय असल्याने कोणी म्हणतील की या देशांतले बहुसंख्य हिंदू हे तत्त्व मान्य करतील पण मुसलमान व ख्रिश्चन किंवा इतर धर्मीयांचे काय? त्याचे उत्तर म्हणजे ज्या बळजबरीने हिंदू धर्मांतर ह्या देशांत झाले ते 'इतर धर्मांच्या गुणवत्तेच्या जाणीवपूर्वक स्वीकाराने झालेले नाही तर राजकीय सत्तेच्या व बंदूकीच्या धाकाने झाले आहे.'

शिवाय अशा तऱ्हेने 'मुसलमान' किंवा 'ख्रिश्चन' बनलेल्या 'चुकलेल्या फकीर व किरीस्तावांची' संतती 'जीव' त्यांच्या घरांतील जन्मामुळे त्याच धर्मात वाढतात व सामील होतात. ह्याला ह्या देशांत व इतरत्र 'कायदेशीर व कॉन्स्टिट्यूनल' मान्यता देणारे 'प्रोगेसिव्ह' व 'सायंटिस्ट' आहेत ना? ही विसंगतीच नाही कां? धर्म अनुवंशिक व कायद्याने असावा कीं जन्मसिद्ध. जातिला अनुसरुन ? कां ज्ञानपूर्वक जाणीवपूर्वक?

मग 'संस्कृतिचा' वारसा 'जन्माबरोबर' येतो ह्या विधानाला त्यांचा विरोध कां असावा? मग त्यांचा **'स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ह्या लो. टिळकांच्या विश्वासालाही 'अशास्त्रीय म्हणून विरोध असावयाला हवा नाही कां?** ह्याचे कारण म्हणजे हे 'प्रोग्रेसिव्हज् व शास्त्रज्ञ' हे भौतिकवादी आहेत. एका 'परेडिममध्ये' आहेत व त्यांची या देशाच्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानाबद्दल व जीवनधारणे व उद्दिष्टांबद्दल एक 'अपवित्र युति' 'Unholy Aliance' आहे. ते क्रियाशीलही आहेत. ही युती वैचारिक Conditioning मेकॉले साहेब व सध्याच्या पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाचेच लक्षण आहे हे लक्षात येईल. त्यांना कोणत्याही आदर्श संस्कृतीचा ध्यास नाही. 'विज्ञानवाद' सोडून इतर प्रश्नांबद्दल त्यांना काही देणे

येणे नाही. ह्या 'सांस्कृतिक उन्नति-वादाबद्दल' ते इतके अनुत्साही कां ? त्याचे कारण प्रवृत्ति!

**अग्नि व जल प्रवृत्ति**

वेदामध्ये अग्नि व जल वृत्तीमधला फरक, अनेक वेळा 'प्रतिक' म्हणून वापरला जातो. 'अग्नि' हा उर्ध्वगतीचा शक्तीस्तोत्र आहे. तो मूलगामी बदल घडवून आणतो. ऋग्वेदांत अग्निच्या 'सामर्थ्याबद्दल' व 'अधिकाराबद्दल' अनेक सुक्ते आहेत. महायोगी अरविंद ह्यांनी 'Hymns on Agni' असा अग्निसूत्रांवर एक विशेष ग्रंथ लिहिला आहे. वैश्विक किंवा 'दैवी अग्निची ' शक्ति ही आध्यात्मिक (स्पिरीच्यीअल) पातळी वाढवणारी शक्ति आहे.

या उलट जलाचा ओढा/प्रवाह हा कनिष्ठ 'नीच' भूमी वा क्षेत्राकडे सहज ओढीचा असतो व म्हणून 'जलाचे प्रतिक' मानवाच्या ह्या अश्या वृत्तींचे प्रतिकात्मक निदर्शक म्हणून वापरण्याचा 'प्रघात' आहे.

**भौतिकवादी प्रोग्रेसिव्हज् :**

ह्या अर्थाने हे भौतिकवादी, निरीश्वरवादी प्रोग्रेसिव्हस् जरी मानभावीपणे 'भौतिकवादी, आदर्शवादी संस्कृतीचा ' आग्रह करत असले तरी तो वरवरचा, उथळ असतो व नकळत 'प्राणीवृत्ती' व 'जलवृत्तीने' घसरणाऱ्या मानवाच्या स्खलनशील वृत्तीचा ते निषेध करत नाहीत, किंवा केला तरी तो वरवरचा देखावा असतो. ते खऱ्या सत्प्रवृत्तींना कळत/नकळत विरोध करतात व 'जलाला' मानवीवृत्तींना संस्कृतीच्या 'ऱ्हासाकडेच' नेण्याचे मार्ग मोकळे करून देतात.

**दैवी संस्कृती :**

संस्कृतीचे अवमूल्यन व अधःपात या प्रवृत्तीच्या विचारवंतामुळेच 'प्रोग्रेसिव्ह' मुळच होतो आहे. हे विस्ताराने सांगण्याचे कारण हेच की.

Multi Culturalisam म्हणजे बहूसंस्कृतिवादाचा पुरस्कार व समर्थन ते ह्या बेजबाबदारीने करतात. जगांतल्या संस्कृतींचा अभ्यास व तुलना न करतां एखाद्या 'दैवी संस्कृतीला' व 'एखाद्या रानटी व पाशवी संस्कृतीला', ते एकाच पारड्यांत टाकतात.

**मल्टिकल्चर व इझम :**

कॅनडा हे एक उदाहरण बहूजातिसंस्कृतिवादाचे म्हणता येईल. बहुविदसंस्कृतिचे उदाहरण म्हणतां येईल!! त्या देशाची <u>**'Federal Policy of Multi Culturalisam**</u> व तिचे भाष्य काय आहे?

" Multi Culturalism means the recognition that Canada is made-up of many ethno-Cultural groups. The government and the people of Canada believe that in a country, which is so culturally, ethnically and racially diverse, the policies of the government must reflect this reality, in order to meet the needs and expectations of our diverse populations."

"Multi Culturalism policy of Canada seeks to ensure equality for all Cultural and focuses on the needs of minority Communities so that they are equal to the needs with majorities?.

निरनिराळ्या संस्कृत्यांचा तुलनात्मक अभ्यास करून ही पॉलिसी ठरविली आहे कां ? संस्कृतिची उंची मोजण्याकरिता कोणती फूटपट्टी वापरायची ? आर्थिक प्रगती, भोगवादी उपकरणांची रेलचेल, सामाजिक अस्थिर शांतता, राजकीय हेतू वा उद्दिष्ट ?

ह्या मुद्यावर <u>मिस्टर पॅट वाईं</u> हे ब्रिटीश विचारवंत ब्रिटनच्या 'मल्टीकल्चरॉलिझम' वर काय म्हणतात ते बघू या...

"Multiculture, as already stated is a fact is a reality, but when the Suffix 'ism' is added,

we have a whole different ball game : the word has then developed the meaning of a doctrine, or a theory; a belief in an idea, and in this particular case the belief that it is desirable to have different cultures existing side by side in the same Society; and more importantly that it is always possible, given the right conditions, for these different cultures to thrive in harmony with one another."

मिस्टर पॅट पुढे म्हणतात की, 'ही सर्व उदारमतवादी मंडळी आपल्याला एका अशास्त्रीय अश्या तत्त्वावर, मनावर किंवा शिकवणूकीवर कां विश्वास ठेवायला सांगतात? कारण ह्या तत्त्वाला विरोध करणाऱ्यांना एक शिवी हासडण्यात येते कीं ते मागासलेले वंशवादी (Racist) आहेत. दूसरी शक्यता म्हणजे त्यांचा 'परीकथा', 'युटोपिया' (Utopia) ह्यावर अशास्त्रीय विश्वास असतो. अगदी ते आरोप करत असलेल्या कडव्या धर्मपंथीयासारखा ते एका राजकीय हेतूचा छुपा प्रचार करत असतात.'

**भोगवादी कंझ्यूमरॉझिम :**

माझ्या मते 'ग्लोबलायझेशनच्या' भोगवादी संस्कृतीला जर कोणा आध्यात्मिक संस्कृतिचा विरोध असेल व तो ह्या आक्रमक जगसत्तेचा मार्केट, प्रसार विस्ताराच्या आड येऊन आर्थिक व राजकीय तोटा होणार असेल तर ते ह्या वरकरणी उदारमतवादी व शांततावादी चेहऱ्याला घातक ठरेल. मग हा विरोध हाणून पाडण्यासांठी ते बळाचा, शस्त्राचा व कुठल्याही कुटील नीतिचा वापर करण्याला मागे पुढे पहात नाहीत, पहाणार नाहीत. कारण, हा बुरखा हे ढोंग आहे व ते एका अशास्त्रीय बैठकीवर विसंबून आहे.

**संस्कृतिचे वेदबीज :**

मला एका गोष्टीची पूर्ण जाणीव आहे. अगोदरच्या काही लेखांत मी 'वेद' हे भारतीय संस्कृतिचे मूळ बीज आहे हे पुनः पुनः प्रतिपादन केले आहे. त्यामुळे कांही उदाहरणे घेऊन हा मुद्दा स्पष्ट करण्याची जबाबदारी माझ्यावर येऊन पडते.

सुरवातीलाच मी असे सांगू इच्छितो की वेदामध्ये ह्या विश्वरचनेची विस्तृत माहिती सांगितली गेली आहे. ती अगम्य, कूट, गुह्यात्मक व अव्यक्त जगातील असल्याने मानवी देहातील जीवाला सर्वसाधारणपणे उपलब्ध नाही. त्याच्या बुद्धीला अनाकलनीय आहे. तसेंच ते ज्ञान 'अनिर्वचनीय' आहे. ह्याचा सरळ अर्थ मानवी ज्ञानाच्या सगळ्या ज्ञानप्रक्रिया व साधने ह्यामार्फत हे ज्ञान व्यक्त-भौतिक भाषेत आणणे अशक्य आहे. म्हणून 'अनिर्वचनीय' आहे. मग हे ज्ञान कुठल्या स्वरूपांत ह्या 'मानवी फॉर्म' मधील जीवाला प्राप्त होऊ शकते ? हे जाणीवेत, अनुभूतीत आणता येते हे नक्की !! पण भाषेत संपूर्णपणे व पूर्ण अर्थवाहीत्वाने नाही !! पण, असे कां होते. तर, त्याचे उत्तर अशी विश्वरचनेची 'सिस्टिम' आहे.

एव्हढे सरळ उत्तर असतानाही मानवाच्या अहंकारी वृत्तीत ह्या सत्याचा स्वीकार होत नाही ही एक खेदाची गोष्ट आहे. खेदाची अशा अर्थाने कीं 'सत्यमेव जयते' अश्या पाट्या आपल्या भौतिकपद्धतीत आदर्श म्हणून स्वीकारणारा हा माणूस 'वैश्विक सत्याचा' मात्र स्वीकार करूं इच्छित नाही. त्याचे दुसरे कारण त्याचा स्वतःच्या अस्तित्वाचा व मृत्यूचा अर्थ माहीत नसलेला हा माणूस वैश्विक गहन सृष्टीच्या सामर्थ्याबद्दल व योजनेबद्दल मात्र एका फाजील विश्वासावर विसंबून आहे. हा विश्वास आहे तो त्याच्या नश्वर अशा 'बुद्धी यंत्रावर'. 'प्राण' गेला की हे यंत्र त्याच्या सगळ्या उपकरणाबरोबरच नाश पावते.

ज्याप्रमाणे एखाद्या मुंगीला ह्या पृथ्वीच्या भूभागाच्या नकाशाचा (Atlas) चे ज्ञान कठीण आहे व त्याच्यापुढेही ह्या पृथ्वी, ग्रह, तारे, चंद्र, सूर्य ह्यांच्या

अस्तित्वाबद्दल व त्यांच्या क्रियाबद्दल त्या तुलनेने सुद्धा 'क्षुद्र' मानवला देखील ह्या ज्ञानाच्या बाबतीत कांही 'जादा अधिकार' नाहीत. 'क्षुद्र' माणूस म्हणतो, कारण सध्या तो भौतिकवादी 'आहार, निद्रा, भय मैथनू' ह्या प्राणी क्रियेपेक्षा' कांही निराळे वर्तन वा साधना करीत नाही आहे. 'Transcendent' म्हणजे 'साक्षात्कारी', 'समाधिजन्य' ज्ञानाकडे त्याची वाटचाल होत नाही तोपर्यंत त्याला हे 'अमरपुत्राचे' स्थान वा वेदज्ञानाचा अधिकार अशक्य आहे.

त्यामुळे 'भारतीय संस्कृति' बद्दल आबद हुसेन ज्या 'भेळपुरी', भौतिकवादीपद्धतीने विचार करत आहेत, त्यांना भारतीय संस्कृतिचे 'वेदबीज' सापडणे कठीण आहे. बीज व बाह्यात्कारी पेहराव व रहाणी ह्यामधला फरक त्यांच्या बुद्धीपलीकडे आहे. त्यामुळे, त्यांनी त्यांच्या 'The National Culture of India' ह्या कॉंग्रेस व सेक्यूलरवादी विचारसरणीच्या ओघांत व कौतुकात बसणाऱ्या पुस्तकांत खालील विधान केले आहे. त्यावर खोलवर विचार व 'सुयोग्य निषेध' इथे मांडलाच पाहिजे.

**अबीद हुसेन ह्यांचा वेद द्वेष :**

'The problems of a New Cultural Synthesis'

ह्या प्रकरणांत अबीद हुसेन एक गरळ ओकतात. " Before we think of a rational solution we must get rid of the futile mentality which urges some of us to try to revive the cultural life, which prevailed during the Vedic or Puranic ages. For this implies the exclusion of all elements which have come from outside, specially those of the Muslim Culture; these have been so completely assimilated in the intellectual, aesthetic and social life of India that they have, as it were, entered the stream of the life blood running through the veins of Indian Culture.

The attempt to separate these ingredients and get them out of the Systems through a process of blood letting will never succeed. It will only enervate our culture and cause it to suffer from pernicious anaemia."
(p. 163-The National Culture of India.)

सावरकरांच्या काळातील 'मोपल्यांचे बंड' ही जखम, बाबराचे आक्रमण व अयोध्येतील उध्वस्त मंदिर, मोगल साम्राज्यवाद्यांनी लादलेला हिंदूवर 'जिझिया कर', इस्लामवर विश्वास नसलेल्यांना 'काफर' समजून त्यांना जीवन नाकारण्याऱ्या इस्लामी संस्कृतीचा स्वीकार भारतीय संस्कृतीने कां करावा? जर हे वीष रक्त व धमन्या व अस्थिमध्ये शिरले असेल तर ते काढावयालाच पाहिजे. सावरकरांच्या काळापासून आजपर्यंत सगळ्या जगाला कोणत्या 'आक्रमक संस्कृती' ने ग्रासले आहे?

शिवाय कोणत्या शास्त्रीय निकषावर ह्या संस्कृतीची गुणवत्ता ठरवावयाची. मध्यएशिया मधल्या जुनाट जीवनपद्धतीवर भाष्य करणाऱ्या प्रॉफेटचे शहाणपण जरी त्या काळी योग्य वाटले तरी १०,००० वर्षे Timetested व 'वैश्विक अपौरुषय ज्ञानावर' आधारलेल्या वेदिक चिरंतन भारतीय संस्कृतीने कां मान्य करायचे? कां मान तुकवावायची? आणि कोण हे अबीद हुसेन ह्या भारत भूमीवरील ईश्वरी, दैवी संस्कृतीला उपदेशाचे डोस देणार? काय अधिकार त्यांचा ?

**'इंटिग्रल वेदाज' :**

'वेदिक ज्ञानपद्धतीचे' आगळे वेगळे वैशिष्ट्य हे आहे की, ते Integral म्हणजे संपूर्ण-संकलित पद्धतीचे आहे. 'Wholistic' आहे 'Reductionist' नाही !! म्हणजे नक्की काय? तर, पाश्चात्य संस्कृति कीं जिच्यात प्रचलित भौतिकवादी विज्ञानपद्धतीचा प्रभाव आहे, त्यांत 'Materialist' भौतिकवादी ज्ञान हेच खरे ज्ञान अशी 'धारणां आहे; व त्या बाहेरचे ज्ञान हे Mystic गूढ व अप्रमाणित, त्यामुळे अग्राह्य असे समजले जाते. त्यामुळे सामाजिक, राजकीय, आर्थिक, शारिरीक वैद्यकी क्षेत्रांतही, ह्याकरितां 'निषिद्ध' मानले जाते. ह्या 'समजाला' दुर्दैवाने राजाश्रय

आहे.

या उलट 'वेदिक ज्ञानपद्धतीत' भौतिक व आध्यात्मिक हा भेद जरुर मानला जातो, पण, ह्या दोन्ही ज्ञानांचा सुंदर मिलाफ सत्य (Truth), 'संपूर्ण ज्ञान' म्हणून मानला जातो. एव्हढेच नव्हे तर ह्या दोन्ही ज्ञानांची एकमेकांशी कशी नाती आहेत हे जाणले जाते व सांगितले जाते. आणि, ह्या 'सम्यग' ज्ञानाचा मानवी ऐहिक जीवनात उपयोग करुन मानवाची आध्यात्मिक उन्नति Spiritual Uplitment साधली जाते. हे एक विलक्षण वैशिष्ट्यपूर्ण व योग्य लक्षण आहे. त्यामुळे ज्याला मानवी समाजाची सांस्कृतिक उच्च जीवन मूल्ये ही कशी ह्या 'ज्ञानावर' - ज्ञानावर आधरलेली आहेत हे पहाणे अत्यंत अभ्यासपूर्ण जिज्ञासेचे आकर्षणच ठरेल ह्यांत शंका नको.

**अन्न-वेद-उपनिषद व अमर्त्य सेन व कार्ल मार्क्स :**

उदाहरणादाखल, आपण 'अन्न' (food) ह्या सर्वसामान्य संज्ञेबद्दल 'भारतीय-वेदिक-उपनिषदिक' तत्त्वज्ञान कोणते 'Integral' 'संपूर्णज्ञान' देते ते पाहू या.

पुरुषसुक्तात चौथ्या ऋचात जे वर्णन आहे ते असे ह्या 'विराट पुरुषाच्या तीन चतुर्थांश, परिवर्तनशील विश्वाच्या बाहेर आहे. त्याचा एक चतुर्थांश पुन्हा पुन्हा विश्वरुप धारण करतो. त्यानंतर तो अन्न खाणाऱ्या (चर) सर्व 'प्राणीमात्रांना' आणि कधीच 'अन्न न खाणाऱ्यांना' 'वस्तुमानांना' (अचर) व्यापून टाकतो. (साशनानशने अभि) याचा अर्थ विश्वनिर्मीतीच्या प्रक्रियेमध्ये 'व्यक्त' जगांत (manifest world) अन्न खाणारे (चर) व अन्न न खाणारे (कधीच नव्हे) असे दोन वर्ग निर्माण झाले. (स्वामी चिन्मयानंद).

आतां 'अन्न' कसे निर्माण झाले ?

भगवान कृष्ण काय सांगतात ? व्यास ऋषी 'रिपोर्ट' देताहेत !!

''अन्नाभ्दवन्ति भूतानि पर्जन्सादन्नसंभवः ।
यज्ञाभ्दवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुभ्द वः ॥
गीता ३.१४

'यज्ञ' म्हणजे एक तऱ्हेचे 'Cosmic Project' जसे, एखाद्या बालकाचा जन्म होतांना विश्वातल्या अनेक 'अेनर्जी' (Energy) काम करत असतात. आपल्या भाषेत म्हणावयाचे 'सर्वकर्मसमुच्चय'.

सर्व कर्मांचा ज्यामध्ये समावेश होतो त्याला 'यज्ञ' म्हणतात. ह्या यज्ञाचा भौतिक क्रियेचे दर्शन एक सर्वसाधारण माणसाला व सध्याच्या भौतिकवादी वैज्ञानिकाला होते. त्यांतील 'अव्यक्त' जगांतील बीजरुपाने रहाणाऱ्या वैश्विक शक्तिच्या क्रिया ह्या 'यज्ञांत' भाग घेत असतात. त्या ह्यांना दिसत नाहीत व खेदाने म्हणावे लागते की 'जाणवतही नाहीत' कारण, त्यात वैश्विक 'इच्छाशक्ती' व 'ज्ञानशक्ति' चा अंतर्भाव असतो. आणि भौतिकवाद्यांना ह्या विश्वाला (काहीही स्वयंभू) इच्छा व ज्ञान असेल हे मान्य नाही !!

पाऊस कां पडतो, कसा पडतो व त्याच्या नियमित क्रिया कुठल्या कारणाने व इच्छने बंदिस्त -बांधलेल्या आहेत हे त्यांच्या कल्पनाशक्तीच्या 'बाहेर आहे' किंवा 'बाहेर टाकले आहे'. पण त्या क्रिया होत असतात व होत राहणार आहेत. त्यांच्या 'यांत्रिकी व गणीती लॉजिक' मध्ये न बसल्या तरीही!! 'पर्जन्यादन्नसंभवः' - ह्या पर्जन्यातून 'अन्नाची' निर्मिती होते. आणि 'अन्नाभ्दवन्ति भूतानि' म्हणजे भूतमात्रांची उत्पत्ती ह्या अन्नामुळे होते. अन्नामुळेच ते जिवंत रहातात.

ह्याचा अर्थ जीवांची निर्मिती करणारी ही विश्वयंत्रणा त्या जीवांना 'अन्न' लागणार व हवेसे वाटणार- म्हणून अवलंबून रहाणार, म्हणून या क्रियांची व्यवस्था केल्यावर त्या अन्नाची निर्मिती करण्याची जबाबदारी बिनचुक-बिनबोभाट पार पाडते.

ह्या जीवमात्रांना त्यांच्या अर्भक अवस्थेत 'अन्न' प्राप्त व्हावे म्हणून त्यां जीवांतील 'मादी' ह्या स्त्री तत्वाला स्तनालाच दूध प्राप्त होते. हाही प्रकार ह्या विश्वयंत्रणेचाच भाग व 'कृपा' आहे नाही कां? आता या 'अन्न' संकल्पनेची पुढील व्याप्ति व रचना पाहू या. Taittiriya Upanishad (तै.उ.) हे उपनिषद आणखी कोणता विशेष प्रकाश टाकते. **अन्नेन जातानि जीवन्ति** । ह्या 'अन्नावर' आधारुन हे जीव आपला 'फॉर्म' (रुप) टिकवतात. म्हणजे जे अनेक 'Body forms' जे 'Discovery Channel' वर दिसतात ते सर्व 'फॉर्मस' ह्या अन्नावर टिकतात व वाढतात !!

अन्नं प्रयन्त्यभिसंविशन्तीति ।

आणि शेवटी दूसऱ्या जीवांचे किंवा जीवासांठी 'अन्न' बनतात !! पारशी जमातीचा 'अवेस्ता' हा धर्मग्रंथ आहे. वेद पूर्वकालीन आहे त्यातील ज्ञानावर अवलंबून मृतदेह 'टॉवर ऑफ सायलेन्स' ह्यांतील विहीरीमध्ये गिधाडां (Vultures) पुढे भक्षणासाठी ठेवला जातो. 'अवेस्ता' हे वेदांच्या ज्ञानाच्या धर्तीवरचे व सारखेच ज्ञान आहे. हे लक्षांत घ्या.

अन्नं न निंद्यात् । तदव्रतम् । प्राणो वा अन्नम । शरीरमन्वादम् । प्राणे शरीरं प्रतिष्ठितम् । शरीरे प्राणः प्रतिष्ठितः । तदेतद्न्नमन्ने प्रतिष्ठितम् । स य एतदन्नमन्ने प्रतिष्ठितं वेद प्रतितिष्ठति । अन्नवानन्नादे भवति । महान्भवति प्रजयाः पशुभिर्ब्रम्हवर्चसेन । महान कीर्त्या । इति सप्तमोऽनुवाचः॥

(तै. उ.७वा अनुवाक)

ह्याचे H.N. Ramaswamy ह्यांनी आपल्या पुस्तकांत (भारतीय विद्या भवन 1985) ह्या पुस्तकांत केलेला अनुवाद व भाष्य मूळ स्वरुपांतच देतो इतके ते सुंदर आहे. त्या पुस्तकाला डॉ. करणसिंग ह्याचा Foreward आहे. ते म्हणतात - "In my view, India is the only Country which can bring about this Convergence between science and philosophy." There is a crisis in the divergence between knowledge and wisdom between 'ज्ञान' and 'विज्ञान'.

ह्या अनुवाकचे भाषांतर असे-

" Do not treat food lightly (with Scant respect) This is verily the worship (of all God's) / (for), food is verily the life (of all Creatures) / Body is the bestower of food/Prana (प्राण) is established in the body (by Continually feeding in the body it self). Body is established in the Prana (by Continually feeding on prana). Therefore one food is established in the other food. One who knows this mutual feeding of one food on the other is firmly established (in Truth). He eats and is also eaten / He becomes cosmic in bondage, knowledge and acquires cosmic light / becomes possessed of cosmic glory . This is the Seventh reflection".

ह्या 'अन्न दर्शनातला' महत्त्वाचा भाग कोणता? हे भौतिक शरीर जन्मभर-श्वास असेपर्यंत अन्न भक्षण करते व नंतर हा देह दुसऱ्या जीवाचे 'भक्ष' होतो, एव्हढाच मर्यादित नाही. तर, हा जीव ह्या देहाच्या पिंजऱ्यात बद्ध असतानाही हे अन्न आंतल्या प्राणशक्तीचे भक्ष असते.

अशा तऱ्हेने प्राण ही शक्ती ग्रहण करून देह जगवीत असते. हा अन्नरस 'सात धातू' तत्त्वे म्हणजे रक्त, मांस, मेधा, अस्थि (हाडे) वगैरेंना पोसत असतो, व सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'वीर्य व ओज' ह्यांच्या निर्मितीत गढलेला असतो. हे विशेष कां, तर त्यांच्यामार्फत नवीन जीवाची उत्पत्ती होत असते. शिवाय ह्या वीर्याचा योगिक मार्गाने 'उर्ध्वरेत' पद्धतीने सहस्त्रार चक्रात जाऊन सोमरस व चैतन्याचा स्त्राव होत असतो व त्यानेच Transcenlent अश्या देहापलीकडील, व्यक्त जगापलीकडील ज्ञानाची प्राप्ति होत असते. ही क्रिया व ज्ञान मनाच्या ह्या पद्धतीच्या पोसण्याने होत असते.

आता या थोड्याश्या त्रोटक पद्धतीने 'अन्न' ह्या

संकल्पनेचे जे ज्ञान ही वेदिक, उपनिषदिक संहिता ज्या ज्ञानपद्धतीने देत आहेत. त्यांतील संपूर्णपण, संकीर्णता 'Integratily' सहज ध्यानांत यावी. त्याचबरोबर वैश्विक रचनेची व्याप्ति, उद्देश ध्यानांत यावा.

मग, ह्या ज्ञानावर आधारलेली 'समाजरचना' अर्थातच ह्या रचनेला अनुकूल अशीच जीवनमूल्ये प्रसारित करणार व समाजधारणा बनवणार नाही कां?

**अन्न व नैतिक जीवनमूल्ये :**

त्यामुळे, 'अन्नावर' वैदिक हिंदूसमाजात 'मालकी हक्क' नाही ही भावना निषेधार्ह आहे. 'Proprietory ownership on Food' ही परकीय व पाश्चात्य संकल्पना आहे. त्यामुळे अन्नाची निर्मीती व वांटप ह्यांत विश्वरचनेचा हात व उद्देश व 'सर्वजीव समभाव' आहे असा ठाम विश्वास, 'हिंदू भारतीय संस्कृतीचा आहे'. निसर्गाच्या नैतिकतेवर विश्वास आहे. नैसर्गिक व आपल्या आई बापावर विश्वास व श्रद्धा आहे !! ही गोष्ट आता विरळ झाली आहे. उलट 'अन्नवांटप' हे 'Purchasing Power' असलेल्यालाच प्राप्त होईल असा नैतिक विश्वास व कृत्रिम यंत्रणा पाश्चात्य संस्कृतित विकसित झाला व रूढ आहे.

कार्ल मार्क्स ह्याने जरी 'Money' म्हणजे पैसा याच्या सत्तेला विरोध केला तरी त्याची दृष्टी ही निसर्गाच्या मूळ उद्दिष्ट व न्याय यावर आधारलेली दिसत नाही. ह्यावर तोडगा म्हणजे लढा हा मानवा मानवांतच आवश्यक आहे व या एकाच 'भौतिक ज्ञानांतर्गत सीमित पॅरेडिममध्ये तो राहिला. 'नोबेल प्राइझ विनर' डॉ. अमर्त्य सेन ह्यांच्या बंगालच्या दुष्काळावर मांडलेल्या 'गणीती ज्ञानात' ह्या जीवनमूल्यांचा ध्यास दिसत नाही. ते फक्त 'Human Distribution Systems' म्हणजे 'मानवी मार्केट वितरण व्यवस्थांवर' दोष मारतात. पण ती अन्नावरील 'मानवी हक्क' व पैशावर आधारलेली वितरण संस्था दोषी आहे, असे मानत नाहीत. खरे पाहता, प्रत्येक नैसर्गिक संपत्तीवर मालकी हक्क सांगण्याचा मानवी लढा आता पराकोटीला गेला आहे. उलट, भारतीय संस्कृतित अन्नाचा संयमित वापर, अन्नदान व अन्न 'परब्रह्म' ह्या सारख्या अनेक संकल्पना व रीतिरिवाज ह्या 'वैश्विक न्यायावर' आधारलेल्या आहेत हे दिसेल. व त्याचे दर्शन वैदिक श्रुतीज्ञानावर आधारलेले दिसले. दामाजीपंत ह्या सरकारी 'गोडाऊनकीपरने' दुष्काळात अन्नाच्या गोडाऊनचे दरवाजे सताड उघडले, ह्या पाठीमागे ह्या 'वैश्विक नैतिकतेचा व न्यायाचा संदर्भ आहे. कोणीही उपाशी राहू नये व रहाणार नाही या न्यायानेच नंतर स्वतः अन्न ग्रहण करणारा हा 'भारतीय' जास्ती योग्य 'नैतिक व शास्त्रीय दर्शन व वर्तन' करतो असे कां म्हणू नये ?

भारतीय संस्कृतीत, त्यामुळे 'जीवनमूल्यांचा' उदय हा वैश्विक शास्त्रीय व आध्यात्मिक ज्ञान व तत्वांवर आधारित आहे असे सहज मानावे लागेल. ह्या बीज आधाराची विस्मृति सध्या झाली आहे.

**जीवन मूल्यांची सांस्कृतिक प्रगति**

पण, मानवाच्या 'सत्यशोधनाबद्दल' (?), सामाजिक मूल्यांच्या आदर्शवादाबद्दल चाललेल्या सद्यकालीन धडपडीबद्दल मूलभूत शंका घेतल्या नाहीत तरी त्या एका अहंकारी, अज्ञानी व एकांगी व फाजील आत्मविश्वासी मानवाच्या आहेत असे म्हणावेच लागेल. कां, ते पुढे पाहू या.

(क्रमशः)

**यशवंत साने**
(स्पिरीच्युअल सायन्स सेंटर)
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी : २५३६ ८४५०
ई-मेल : yrsane@eth.net

**पुस्तक परिचय**

# पहिलं पुस्तक

पहिलं पुस्तक हा कोणाही लेखकाचा अगदी जिव्हाळ्याचा विषय. या पहिल्या पुस्तका संबंधीच्या सर्व कडू गोड आठवणी सर्वच लेखकांनी आपल्या मनामध्ये हळुवार जपलेल्या असतात. आणि आपल्या आवडत्या लेखकाच्या अशा आठवणीबद्दल वाचायला किंवा आपल्या आवडत्या पुस्तकांच्या निर्मिती प्रक्रियेबाबत बद्दल वाचायला वाचकांनाही नक्कीच आवडते. म्हणूनच हे पुस्तक नक्कीच वाचनीय आहे.

पुस्तकाचा उद्देश मराठवाड्यातील साहित्य क्षेत्राची ओळख करून देणे असा आहे. त्यानुसार साधारण १९५५ ते १९९४ या कालावधीत प्रकाशित (३-४ पुस्तकांच्या प्रकाशन वर्षा बाबत उल्लेख नाही.) झालेल्या ३२ लेखकांचे त्यांच्या पहिल्या पुस्तकाबद्दलचे मनोगत यात आहे.

यातील बहुतेक लेखकांची पार्श्वभूमी शेतकरी कुटुंब, गरीब मजूर वगैरे अशीच आहे. त्यामुळे कदाचित बहुतेक पुस्तकांच्या विषयांची पार्श्वभूमी देखील संघर्ष, चळवळ, सामाजिक घटनांचा परिणाम इ. अशीच आहे.

त्यामुळे मराठवाड्यातील साहित्य प्रामुख्याने अशाच सामाजिक विषयांना वाहिलेले किंवा अशाच विषयांवर आधारित आहे असे वाटते. (बाल कविता, संशोधनपर लिखाण किंवा स्त्रीप्रधान कथा असो दोनचार वेगळे विषयही आहेत.) यातील बहुतेक पुस्तकांना पुरस्कार/सन्मान मिळालेले आहेत.

पहिल्या पुस्तकाबद्दलची जिव्हाळ्याची भावना अर्थात सर्वच लेखकांमध्ये आहे. काही जण तर खूपच भावूक होऊन लिहितात.

पुस्तकाबद्दलची पार्श्वभूमी, पुस्तक निर्मिती प्रक्रिया आणि पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर त्याबद्दलच्या प्रतिक्रिया प्रसिद्ध पुरस्कार इ. असेच साधारण सर्व लेखांचे स्वरुप आहे.

बहुतेकांना प्रकाशन प्रक्रीयेमधे खूप अडचणी आल्या आहेत. पण काहींनी त्यांचे खूपच सविस्तर वर्णन लिहिल्या सारखे वाटते. अर्थात त्यांनी ते अनुभवले आहे म्हणा ! पण त्यामुळे पुस्तक प्रकाशन हे अत्यंत कटकटीचे किंवा जोखमीचे काम आहे , त्यामुळे सावधान! असा इशारा पुन्हा एकदा मिळतो.

तसेच ज्या वाचकांनी व्यक्तींनी पुस्तकावर टीका केली व नंतर जी पुस्तके प्रसिद्ध झाली त्यांना त्यांची नावे न घेता चोख उत्तरे देण्याची संधी या लेखांतून अनेकांनी साधली आहे. आणि ज्यांनी मदत केली त्या सर्वांचा आवर्जून उल्लेखही आहे.

तसेच इतक्या वर्षानंतर पुन्हा पहिल्या पुस्तकांबद्दल लिहितांना बहुतेकांनी तटस्थपणे पुन्हा स्वतःच्या पुस्तकाचे परीक्षण करून त्यातील उणीवाही मान्य केल्या आहेत.

श्री. नरहर कुरुंदकर, श्री. प्रकाश कामतीकर, श्री. फ. मु. शिंदे अशा काही लेखकांच्या सहकार्याबाबतीत आवार्जून उल्लेख अनेक लेखात सापडतो.

सर्व लेखकांचा थोडक्यात परिचय आवश्यकच होता. परंतु तो जर त्या त्या लेखाच्या सुरूवातीला किंवा शेवटी दिला असता तर अधिक आवडले असते.

मुखपृष्ठ - 'पहिल्या पुस्तकाच्या मोरपंखी आठवणी' अशा अर्थाने तयार केले असावे. चांगले आहे

पण ते मोरपिस खुपच अंधुक अस्पष्ट दिसते.

मला आवडलेले लेख -

रेखा बैजल :- (मानस) यामध्येपहिल्या पुस्तकाच्या निर्मितीपेक्षा स्वत:तील लेखिका कशी निर्माण झाली याबाबतचे विवेचन किंवा त्यांच्या एकंदर लेखना संबंधीचे विचार जास्त असेल तरी प्रकाशन प्रक्रियेतील अडथळ्यांच्या लांबलचक कथानापेक्षा चांगले व थोडक्यात वाटले. प्र. ई. सोनकांबळे, व राम दोतोंडे या दोघांचेही लेख आवडले. अनिल दळवी थोडक्यात पण छान !

- संपा. रमेश राऊत

पहिलं पुस्तक : राऊत रमेश

औरंगाबाद, साकेत प्रकाशन, २००३

पृ. १६८ मूल्य: रु. १३०/-

ISBN-81-7786-142-S

## 'दिशा' दहाव्या वर्षात

*या महिन्यातील अंकाबरोबर 'दिशा' दहाव्या वर्षात पदार्पण करीत आहे. व्ही. पी. एम्. दिशा या नावाने नोंदणी होण्यापूर्वी विद्याप्रसारक मंडळाने जुलै १९९६ मध्ये दिशाचा पहिला अंक काढला.*

*संस्थात्मक शास्त्र, अध्यात्म, साहित्य, संत साहित्य, विज्ञान, भाषा अशा अनेकविध विषयांवर चिंतनास चालना देणारे साहित्य मराठीतून देण्याची परंपरा दिशाने चालू ठेवली आहे. अनेक वाचक, वर्गणीदार, हितचिंतक, चाहते यांच्या प्रोत्साहनामुळे दिशाचे दशक पूर्ण होणार आहे. 'परिसर वार्ता' हे आमच्या परिसरातील घटना घडामोडींचा परामर्श घेणारे सदर हे ही दिशाचे वैशिष्ट्य आहे.*

**दि शा**

नियमित वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

प्रतिक्रियांसाठी

दूरध्वनी

☎ २५४२ ६२७०

**आगामी परिषद**

**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन**

आयोजित

**अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत्र**

या विषयावरील चर्चासत्र

दिनांक : २७ व २९ ऑगस्ट २००५

अधिक माहितीसाठी आमच्या

www.vpmthane.org

या संकेतस्थळाला भेट द्या.

# परिसर वार्ता

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभागाचे पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील उज्ज्वल यश**

फेब्रुवारी २००५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ठाण्यातील डॉ. बेडेकर विद्यामंदिर, प्राथमिक विभागातून कुमार शुभम बहाडकर हा जिल्ह्यात प्रथम व राज्यात ४थ्या क्रमांकाने तर कुमारी प्रज्ञा पंडित ही जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाने शिष्यवृत्ती मिळवून गुणवत्ता यादीत झळकले आहेत.



**श्री. दिलीप जोशी विद्यार्थ्यांना पारितोषिक देताना.**

या शाळेतून एकूण ५८ विद्यार्थी या परीक्षेस बसले होते. यातील सर्व विद्यार्थी उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. गणित विषयात दोन विद्यार्थ्यांना १०० पैकी १०० गुण मिळाले. या सर्व विद्यार्थ्यांना ज्येष्ठ शिक्षिका सौ. विजया भंडारे, सौ. सीमा रजपूत, व सौ. मनीषा गोखले यांनी मार्गदर्शन केले. तसेच त्यावेळच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधा मळेकर यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना विशेष मागदर्शन केले. गुणवत्ता यादीतील विद्यार्थी व मिळविलेले गुण -

१) शुभम राजन बहाडकर — २९०/३००
राज्यात ४था क्रमांक

२) प्रज्ञा महादेव पंडित — २८६/३००

दि. १६/६/२००५ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. वि. करंदीकर यांच्या उपस्थितीत या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

**विद्या प्रसारक मंडळ**
**सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल, ठाणे**

**१) महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा निकाल**

इ. ९वी व ८वी तील खालील विद्यार्थ्यांची महाराष्ट्र शोध परीक्षा एप्रिल २००५ साठी उत्तम गुणांनी पास होऊन निवड झाली.

| नाव | गुण | | इयत्ता |
|---|---|---|---|
| १) तेजस सावंत | १९१ | राज्यात १२वा | ९वी |
| २) श्री पटवर्धन | १७४ | राज्यात २९वा | ९वी |
| ३) निखिल जोशी | १६७ | ठाण्यात ५वा | ९वी |
| ४) प्रणय डोके | १६५ | ठाण्यात ९वा | ९वी |
| ५) विविक्तेश आगवण | १६३ | ठाण्यात १०वा | ९वी |
| ६) मोनिष म्हात्रे | १३७ | राज्यात २७वा | ८वी |
| ७) प्राची जोशी | १२८ | ठाण्यात २७वी | ८वी |

**२) संस्कृत शिष्यवृत्ती - एप्रिल २००५**

एप्रिल २००५ मधे झालेल्या संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेत तनुज नाबर या विद्यार्थ्याने १०० पैकी ८८ गुण मिळवून शिष्यवृत्ती मिळवली.

### राज्यस्तरीय बालवीर-वीरबाला परीक्षा

खालील बालवीर-वीरबाला परीक्षेत यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले.

| बालवीर | वीरबाला |
|---|---|
| १) चिन्मय भट | १) शलाका कर्णिक |
| २) मिहिर देवधर | २) पल्लवी छिद्रवार |
| ३) प्रतीक फुलसुंदर | |
| ४) वैभव व्होरा | |
| ५) प्रणय डोके | |
| ६) गौरव ठोसर | |
| ९) धवल फडके | |

### मार्च २००५ ची माध्यमिक शालांत परीक्षा

**उत्तीर्ण झालेल्या मुलांचे यश**

**परीक्षेला बसलेले विद्यार्थी - १४६**

**उत्तीर्ण विद्यार्थी - १४६**

**टक्केवारी - १००%**

| | |
|---|---|
| ९०% च्या वर | ०९ |
| ८५ ते ८९% | ३० |
| ७५ ते ८४% | ४६ |
| ६० ते ७४% | ४२ |
| ४५ ते ५९% | १८ |
| ४५ पेक्षा कमी | ०१ |
| | १४६ |

| गुणानुक्रमे पहिले दहा | गुण |
|---|---|
| १. कोरगांवकर चैतन्य | ६९० |
| २. सावंत अमृता | ६८८ |
| ३. जोशी श्वेता | ६४७ |
| ४. ठोंबरे अमृता | ६८६ |
| ५. प्रधान पूनम | ६८५ |
| ६. जाधव अपूर्व | ६८५ |
| ७. वेलणकर कविता | ६७८ |
| ८. सकपाळ साहिल | ६७७ |
| ९. कायल अपूर्वा | ६७६ |
| १०. कुलकर्णी शंतनु | ६७० |

**विषयवार सर्वाधिक गुण**

| | | |
|---|---|---|
| इंग्रजी | ठोंबरे अमृता | ८१ |
| | कंडलूर अभिजित | ८१ |
| | अय्यर रोहन | ८१ |
| संस्कृत | ठोंबरे अमृता | ९८ |
| हिंदी | मिसळ मानसी | ९८ |
| मराठी | सावंत अमृता | ८९ |
| गणित | देसाई सर्वेश | १४७ |
| | गायकवाड श्वेतांबरी | १४७ |
| विज्ञान | कोरगांवकर चैतन्य | १४८ |
| समाजशास्त्र | वेलणकर कविता | १४५ |
| गणित + विज्ञान | कोरगांवकर चैतन्य | २९१ |
| | वेलणकर कविता | २९१ |

## प्रदीप कर्णिक यांना मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयावर केलेल्या संशोधनासाठी पीएच्.डी.

> *डॉ. प्रदीप कर्णिक हे व्ही.पी.एम्. दिशाचे सुरुवातीपासूनचे लेखक, हितचिंतक व वर्गणीदार आहेत. 'दिशा' तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.*
>
> *- संपादक*



श्री. प्रदीप कर्णिक

मुंबईच्या रूपारेल महाविद्यालयाचे ग्रंथपाल व ठाण्याचे सुरुवातीपासूनचे रहिवासी श्री. प्रदीप कर्णिक यांना पुणे विद्यापीठातर्फे 'ग्रंथालय आणि माहिती शास्त्र' या विषयात पीएच.डी. पदवी बहाल करण्यात आली आहे. आय.आय.टी., मुंबई आणि मुंबई विद्यापीठाचे निवृत्त ग्रंथपाल डॉ. एस.आर. गणपुले यांच्या मार्गदर्शनाखाली कर्णिक यांनी Assessment of contribution of a public library to the society with specific reference to cultural and literary development : a case study of Mumbai Marathi Grantha Sangrahalaya. असे शर्षिक घेऊन प्रबंध सादर केला होता. मुंबई विद्यापीठाच्या अधिपत्याखाली येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथपालांमध्ये 'ग्रंथालय आणि माहिती शास्त्र' या विषयात पीएच्.डी. मिळवणारे प्रदीप कर्णिक हे पहिले महाविद्यालयीन ग्रंथपाल ठरले आहेत.

सार्वजनिक ग्रंथालये आणि त्यातही मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय हे त्यांचे अतिशय जिव्हाळ्याचे विषय असल्याने, कर्णिकांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयावर ग्रंथालयशास्त्राच्या दृष्टिकोनतून संशोधन करण्याचे ठरवले होते. संग्रहालयाच्या १०४ वर्षांच्या इतिहासाऐवजी संग्रहालयाने केलेल्या विविध प्रकारच्या विस्तारित उपक्रमांवर (Extension activities) खोलात जाऊन संशोधन केले. संग्रहालयाने योगदान तपासतांना कर्णिकांनी सार्वजनिक ग्रंथालयांसाठी तयार करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय मानकांच्या बरोबर संग्रहालयाच्या कार्याची तुलना केली. त्यांत त्यांनी असे निष्कर्ष काढले की, संग्रहालयाने ही आंतरराष्ट्रीय मानके तर पार केलेलीच आहेत. परंतु त्यांच्याही पलिकडे जाऊन काही क्षेत्रात आपला विषेष ठसा उमटवलेला आहे.

अमेरिकेतील ग्रंथालयशास्त्रातील ख्यातनाम विचारवंत आणि संशोधक प्राध्यापक कै.जे. एच्. शेरा यांनी तयार केलेली Social Epistemological Foundations of Libraries ही तत्त्व प्रणाली घेऊन त्या तात्त्विक चौकटीतही संग्रहालयाचे योगदान कर्णिकांनी तपासले. या तात्त्विक चौकटीचा आधार घेऊन एखाद्या सार्वजनिक ग्रंथालयाचे योगदान तपासण्याचे कार्य भारतात तरी प्रथमच होत आहे.

महाराष्ट्राच्या आणि विशेषत: मुंबईच्या सांस्कृतिक आणि मराठी साहित्याच्या इतिहासात संग्रहालयाचे काम महत्त्वाचे आहे. त्यात त्यांनी संग्रहालयाच्या विशेष योगदानाबद्दल संग्रहालयाला महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्रातील विशेष सार्वजनिक ग्रंथालय' चा दर्जा द्यावा अशी शिफारस केली आहे. संग्रहालय प्रेमी, ग्रंथालयशास्त्राचे जाणकार, मराठी साहित्याच्या अभ्यासकांनी आणि इतर मित्र-परिवाराने कर्णिकांचे या कार्याबद्दल अभिनंदन केले आहे. या कामी त्यांना प्रा. मा. र. सिवडकर, वसंत साने या ज्येष्ठांचेही सहकार्य लाभले.